**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :०४/०३/२०१९

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र.७ गुरुवार दि.०७/०३/२०१९ रोजी सकाळी ११.००वाजता** अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**गुरूवार दिनांक -०७/०३/२०१९ ची विषय पत्रिका**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ६१ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक - ६१ गुरूवार दिनांक ०७/०३/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर महानगरपालिका जा.क्र.अर्थ /अंदाजपत्रक/१४१४,दि.२८/२/२०१९

**विषय :-**सन २०१८-२०१९चे सुधारित व सन२०१९-२०२०चे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सादर करणेबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रकाचा विषय मा.स्थायी समिती सभेत घेणेत यावा. ही विनंती.

येणे प्रमाणे मा. मुख्यलेखाधिकारी यांचे पत्र

प्र.नगरसचिव श्री. तडवी :- श्री. भुसारे , पी.ए., मा. सभापती सो. यांचे निदर्शनास आणून देणे.

मा.सभापती साहेब :- अर्थसंकल्पीय सभा दिनांक ०७/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. काढणे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--***--

मा.स्थायी समिती सभा गुरूवार दि.०७/३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. मा.स्थायी समिती सभागृह महानगरपालिका नविन प्रशासकिय इमारत,औरंगाबाद रोड येथे सुरू झाली असता मा.आयुक्त साहेब यांनी मा.स्थायी समिती सभापती साहेब यांचे सभेमध्ये पुष्प गुच्छ देवून स्वागत केले सर्वात प्रथम मी मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे समितीच्या वतीने हार्दिक स्वागत करते. व अंदाजपत्रकीय सभेस सुरूवात करणेस सुचित केले.

मा.आयुक्त साहेब यांनी अहमदनगर महानगरपालिकाचा अर्थसंकल्प मा.स्थायी समितीस सादर करून अर्थसंकल्पावरील आपले मनोगत व्यक्त केले.

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- नव्याने रूजू झालेले आयुक्त मा.श्री.श्रीकृष्ण भालसिंग यांचे स्थायी समिती तर्फे स्वागत करतो,मा.आयुक्त साहेब यांचा प्रशासकिय सेवेतील प्रदिर्घ अनुभव असून या अनुभवाचा शहरविकासाच्या सकारात्मक निर्णय घेतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

उपस्थित सर्व मा.स्थायी समिती सदस्य, महानगरपालिकेचे सर्व विभाग प्रमुख व अधिकारी,पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.नुकत्याच झालेल्या दि.४/३/२०१९रोजी मा.स्थायी समितीच्या सभापती माझी निवड झाली आहे.प्रशासनाने लगेचच स्थायी समिती मध्ये अर्थसंकल्प सादर करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला त्यानुसार आजची अर्थसंकल्पावरील सभा आयोजीत करण्यात आलेली आहे.प्रत्येक संस्थेमध्ये अर्थसंकल्प अत्यंत महात्वाचा भाग असून या माध्यमातुन शहराच्या प्रगतीचा आलेख आपल्याला उंचावण्याची संधी आहे.नुकत्याच झालेल्या निवडीने माझ्यावर शहर विकासाची मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे.ही जबाबदारी आपल्या सर्वाच्या सहकार्या शिवाय पुर्ण करू शकत नाही.

नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर होवून जवळपास १६वर्ष झाली आहेत.परंतु अदयापही शहरमध्ये मुलभुत सुविधा देण्यात महानगरपालिकेस यश आलेले नाही.नुकत्याच कुत्र्याच्या चाव्याने ३वर्षाच्या बालकाचा मृत्यु झाला.ही अत्यंत खेदाची व गंभीर स्वरूपाची बाब आहे.या गोष्टींचा त्रास नागरीकांना तर होतोच,त्यामुळे नागरीकांच्या रोषास नगरसेवकांना जावे लागते.माझी सर्व मनपाच्या अधिकारी तसेच विभाग प्रमुख,खातेप्रमुख,कर्मचारी यांना विनंती आहे की,आपण सर्वांनी जर आपली कामे चोख बजावली तर नगरशहराचा काया पालट झाल्या शिवाय रहाणार नाही.आज आपल्यासमोर शहरातील अत्यंत महत्वाचे प्रश्न आहेत,शहरातील घनकच-याचा प्रश्न मोठा असुन ब-याच भागामध्ये वेळेवर साफसफाई होत नाही. शहरातील ब-याच भागामध्ये ड्रेनेज लाईन जुन्या झाल्याने वारंवार फुटुन रस्त्यांवर दुर्गधीयुक्त पाणी रस्त्यावर येते.घंटागाडया वेळेवर येत नाहीत,परिणामी सर्व कचरा रस्त्यावर पडुन रहातो. या सर्व गोष्टींमुळे शहरातील सर्व भागामध्ये साथीचे रोग पसरतात व नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परीणाम होतो. त्याच प्रमाणे अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे. शहराच्या मध्यवस्तीमध्ये ब-याच भागामध्ये रात्री २ ते ३ वा.पाणी येते.याबाबत तात्काळ नियोजन करून शहरातील सर्व भागामध्ये उच्चदबाने पाणीपुरपठा होईल याबाबत निर्णय घ्यावा.

सर्व स्थायी समिती सदस्य व अधिकारी यांच्या सहकार्यातुन आपण नविन सादर करण्यात येणा-या अर्थसंकल्पाचे स्वागत करून,अर्थसंकल्पामध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या योजना तसेच शहराच्या सर्वागीन विकास करण्याकरीता आपण मला सहकार्य कराल अशी खात्री बाळगतो.

मा.श्री.अविनाश घुले :-स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने बजेट सादर करण्यास आधीच उशिर झालेला आहे.तसेच लोकसभेची आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागु शकते.अशा परिस्थीतीमध्ये जास्तवेळ न घालविता आपण बजेटवर दोन तासामध्ये अवलोकन करण्यास वेळ देण्यात यावा.

मा.श्री.मनोज कोतकर :- लोकसभेची आचारसंहिता लवकर लागणार आहे आमच्या सदस्यांची मागणी आहे अभ्यासासाठी २ तासवेळ मिळावा.

मा.श्री. योगीराज गाडे :-कमीत कमी १ दिवस तरी वेळ दयावा.

मा.सभापती साहेब :-लोकसभेची आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागु शकते.अशा परिस्थीतीमध्ये जास्तवेळ न घालविता मा.श्री.अविनाश घुले व सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे सभा दोन तासाकरीता तहकुब करण्यात येत आहे. बजेटवर लेखाशिर्षानिहाय चर्चा करण्यात करीता दुपारी ३.०० सभा सुरू होईल.

सर्व विभाग प्रमुख व खाते प्रमुख यांनी आपल्याकडील उपलब्ध असलेल्या माहितीसह सभेमध्ये उपस्थीत रहावे.

मा.श्री.गणेश कवडे :-अंदाजपत्रकाच्या पुस्तकावरील हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे भवन हे नाव पुसट झाले आहे ते पुढील छपाई करताना ठळक करण्यात यावे.संबंधीतांना आदेश देण्यात यावे.

**दिनांक ०७/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.तहकुब झालेली व सभा दुपारी ३.०० वा. सुरू करण्यात आली.**

मा.सभापती साहेब :- तहकुब झालेली सभा सुरू करण्यात यावी. लेखाशिर्ष निहाय संबंधीत विभाग प्रमुख यांनी माहिती दया.

मा.मुख्य लेखा अधिकारी श्री. मानकर :- सन २०१८-२०१९ ते २०१९-२०२० चे अंदाजपत्रकासाठी आपण या ठिकाणी जमले आहोत अंदाजपत्रकाचे महसुली जमाचे वाचन करीत आहे.

वसुली विभाग जमा बाजु वाचन केले अ.नं. १ ते १२

मा.सभापती साहेब :-रस्ता बाजू करचा खुलासा करा.

रिव्हीजन विभाग श्री. झीने :- रस्त्याच्या कडेला बसून व हातगाडीवर जो माल विक्रेता त्यांच्या कडून वसुल होणारा

मा.श्री.अविनाश घुले :- सर्वसाधारण कराच्या लेखाशिर्ष मध्ये २० टक्के वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मागील अर्थसंकल्पामध्ये ५६ कोटी धरण्यात आले होते.या उत्पन्नमध्ये वास्तविक पहाता वाढ अपेक्षीत आहे.उत्पन्नवाढीच्या दृष्टीने वाढ करणे आपेक्षीत असते.उत्पन्न वाढविण्याकरीता प्रयत्न करणे आवश्यक असते. उत्पन्न वाढीकरीता कोणत्याही प्रकारे प्रयत्न झालेले दिसुन येत नाही.नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून घरपट्टी उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होईल.वसूली करीता सक्षम अधिका-यांच्या प्रभाग वाईज नियुत्या केल्याने कर विभागाकडे सक्षम अधिकारी असल्यास या करामध्ये वाढ होईल. सर्वसाधारण कराच्या लेखाशिर्ष मध्ये २० टक्के वाढ करण्यात यावी.

मा.श्री.अविनाश घुले :- बिगरशेती करतांना महानगरपालिका हद्दी मध्ये बिगरशेती जामीनीवर टॅक्स लावणे अपेक्षित आहे.

मा.सभापती साहेब :- बिगरशेती करतांना महानगरपालिका हद्दी मध्ये बिगरशेती जामीनीवर टॅक्स लावणे अपेक्षित आहे.मालमत्ता सध्या शेती असून बिगरशेतीचे प्रस्ताव सादर करतांना त्यांचेकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही असे निदर्शनास येत आहे.या करीता लेखाशिर्ष मध्ये रू.१ कोटी ४० लाख तरतुद करण्यात यावी.

अ.नं.१०-११ वाचन एकूण ४२ कोटी

अग्निशमन विभाग

आग विझविणे अ.नं. १ ते ७ वरील तरतुद वाचन केले.

जमा बाजू तरतुद रूपये १२.८५ हजार

इतर कर एकूण ४९ कोटी ७७लाख आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :-अग्नीशमन विभाग "ना हरकत प्रमाणपत्र " या लेखाशिर्षाअंतर्गत रूपये ५ लाखांनी वाढ करण्यात यावी तसेच अग्नीशमन सुरक्षासाहित्य खरेदीमध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब:- शहरातील ईमारतींची संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे.त्या दृष्टीने या अग्नीशमन विभागाकडील "ना हरकत प्रमाणपत्र " या लेखाशिर्षा मध्ये ५ लाखांनी वाढ करण्यात यावी तसेच अग्नीशमन सुरक्षासाहित्य खरेदीमध्ये रूपये ३लाख ४४ हजार रूपयांनी वाढ करण्यात यावी.

कराव्यतिरिक्त उत्पन्न अ.नं. १ ते ३

मा.श्री.अविनाश घुले :- "मुंबई नर्सिग होम अॅक्ट फि" नियमीत वसूल होते का ? , किती डॉक्टरांनी ओ.पी.डी.ची परमिशन घेवून प्रत्यक्षात हॉस्पीटल चालू केले आहे. अशा डॉक्टरांची संख्या किती आहे,अनेक हॉस्पीटल मध्ये पार्किग साठी जागा सोडलेली नाही. अनाधिकृत बांधकाम केलेली हॉस्पीटल ची संख्या किती आहे ?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- माहिती दिली.

मा.सभापती साहेब :- नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून "मुंबई नर्सिग होम ॲक्ट फि" या लेखाशिर्षा अंतर्गत मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.या लेखाशिर्षा मध्ये ५ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :-कोंडवाडा फी कशा संदर्भात आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- मोकाट जनावरांना जनावरे गोठयात ठेवणे बंधनकारक शेळया, मेंढयासाठी दंडात्मक तरतुद केलेली आहे. आता सध्या यंत्रणा नाही शहरातील सर्व गोठे हलवून पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर जनावरे तेथे हलविण्यात येणार आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- यावर्षी यंत्रणा मिळाली नाही कामगार इतर विभागात आहे. मागील वर्षी ठेकेदाराचे ट्रॅक्टर वेगळा व जनावरे पकडणा-यांचा वेगळा चार्ज असे एकुण रूपये ४ लाख ती टेकन तरतुद केलेली आहे. मागील ३ वर्षात जमा झालेले नाही.

मा.श्री. कुमार वाकळे :- कोंडवाडाच नाही तर मग जनावरे पकडून कुठे ठेवतात. मग बील कसे काढले.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- अदयाप ठेकेदाराला अदा केलेले नाही कोंडवाडा विभाग प्रमुख श्री. म्हसे यांची चौकशी सुरू आहे. तीन, चार महिने झाले चौकशी सुरू होवुन

मा.सभापती साहेबः- तुमच्या निष्काळजी पणामुळे लोकांचे जीव जातात याला जबाबदार कोण ?

मा.श्री. कुमार वाकळे :- त्यांची चौकशी केव्हा संपणार.

अति.आयुक्त श्री. वालगुडे :- सादरकर्ता अधिकारी यांना वारंवार सांगितले.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- या यंत्रणेसाठी स्पेशल डॉक्टर नेमणे आवश्यक आहे.

मा.श्री. कुमार वाकळे :- यात म्हसे दोषी आहेत का, ठेकेदार दोषी आहे का, जनावरे कुठे सोडले.

मा.सभापती साहेब :- कुत्र्याचा विषय गंभीर आहे.

मा.श्री.श्रीकृष्ण भालसिंग ,आयुक्त :- आज दुपारी डॉ. शेळकेशी चर्चा केली जागा वाढविण्यासाठी काय करता येईल. सोमवारी किंवा मंगळवारी मिटींग लावून धोकादायक कुत्र्यांना मारता येईल त्यांना मारणे याबाबत सभेत निर्णय घेता येई.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजुरकरः- पान नं.२६ वरील पर्यवेक्षण (आरोग्य) यातील अ.क्र.३ आकस्मीत खर्चामध्ये रूपये २ लाखांनी वाढ करण्यात यावी.तसेच पान नं.२७ वरील अ.क्र.१६ " स्त्री "जन्माचे स्वागत या लेखाशिर्षाअंतर्गत रूपये २ लक्षाची तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- पर्यवेक्षण (आरोग्य)आकस्मीत खर्चामध्ये रूपये २ लाखांनी वाढ करण्यात येत आहे.तसेच "स्त्री "जन्माचे स्वागत या लेखाशिर्षाअंतर्गत रूपये २ लक्षाची वाढ करण्यात येत आहे.

मा.श्री.योगीराज गाडे :- महानगरपालिकेच्या महालक्ष्मी उदयान व गंगा उदयान या ठिकाणी सध्याचालू असून काम सेल्फी पॉईन्ट चे काम ब-याच दिवसांपासून सुरू आहे.अदयाप पर्यत काम पुर्ण झाले नाही.या बाबात माहिती दयावी.

शाखा अभियांता श्री.पारखे :- काम प्रगतीपथावर असून लवकरच पुर्ण होईल. या करीता चालू आर्थिक वर्षामध्ये तरतुद करावी लागेल.

मा.श्री.योगीराज गाडे :- "सेल्फी पॉईट करणे " या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये १५ लक्ष रूपयांची तरतुद करावी.

मा.सभापती साहेब :- "सेल्फी पॉईट करणे " या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १५ लक्ष रूपयांची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले :- गंगाउद्यान येथील सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदार संस्था मे.यश एन्टरप्रायजेस पुणे यांची मुदत दिनांक ३/७/२०१७ पर्यत होती.त्यानंतर पुन्हा याच संस्थेला ३/३/२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे.सदरची मुदतवाढ संपुष्टात येवून एक वर्षाचा कालावधी उलटुन गेला आहे.पुढील मुदतवाढ नसल्याने सदर उदयानाची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली आहे .या संस्थेकडून देखभाल दुरूस्ती वेळेवर होत नाही.फुलांची झाडे व इतर झाडांची,खेळण्यांची दुरावस्था झालेली आहे.या बाबत या भागातील नागरीकांनी समक्ष भेटून माझ्याकडे अनेक तक्रारी केल्या आहेत.

मा.सभापती साहेब :- गंगाउद्यान देखभाल-दुरूस्ती करीता देण्यात आलेल्या ठेकेदार संस्थेची मुदत संपल्याने एखादया सामाजिक संस्थेला,निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यत गंगाउद्यान देखभाल-दुरूस्ती करीता देण्यात यावे.

मा.श्री. योगीराज गाडे :- अग्निशमन कर्मचा-यांची सुरक्षा करणे.

मा.श्री.गणेश भोसले :- जिवीत हानी झाली तर आम्ही जबाबदार नाही त्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. त्याठिकाणी बिगारी शिपाई आहेत. प्रशिक्षीत कर्मचारी नाहीत. आयुक्त,उपायुक्त यांची जबाबदारी राहिल. प्रशिक्षीत कर्मचा-यांची नेमणूक केली नाही.

मा.श्री. अविनाश घुले :- मानधनावर कर्मचा-यांना घ्या त्यांच्या कोर्स झालेला आहे माझे वॉर्डातील एक कर्मचारी आहे.

मा.श्री.श्रीकृष्ण भालसिंग ,आयुक्त :- आउटसोर्सीग ने नेमू शकतो.

मा.श्री.योगीराज गाडे :-ओपन स्पेसवर बांधकामे करतात त्याला जबाबदार कोण मार्केट कमिटीने ओपन स्पेसवर गाळे बांधणे त्यांना कुणाचा वचक नाही तिथे आज वगैरे लागली त्याला जबाबदार कोण राहिल. कायदयाची भितीच नाही मार्केट कमिटीकडे रूपये २ ते २.५० कोटी थकबाकी आहे त्यांच्यावर कारवाई होत नाही यावर आयुक्तांनी कडक भूमीका घेतले पाहिजे.

कोंडवाडा विभाग श्री. म्हसे :- जून पासून एकुण ९० कुत्रे धरले कोंडवाडा बंद आहे. मागचे पेंडीग बील आहे काम न केल्याने बील झालेले नाही.

मा.सभापती साहेब :- जनावरे धरली तर त्यांच्या पावत्या तर असतील ना त्या मालकाचे नाव वगैरे काही तरी असेल ना ?

कोंडवाडा विभाग श्री. म्हसे :- सुरवातीला जखमी जनावरे सोडल्याचे बील दिले आहे.

मा.श्री.श्रीकृष्ण भालसिंग ,आयुक्त :- डॉ. बोरगे आपण या बाबतची फाईल नंतर दाखवा.

मा.श्री.अविनाश घुले:-जनावरे पकडल्यानंतर,जनावरे सोडतांना फि भरल्याच्या पावत्या असतील ना?

मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :- म्हसे यांना कामावर घेताना चौकशी समितीचा अहवाल देण्याची आवश्यकता वाटले नाही.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- फाईल त्यांचेकडे असायच्या माझ्याकडे फाईल उपलब्ध झाली नाही.

मा.श्री.कुमार वाकळे :- इथून पुढे कुत्रे चावल्याच्या घटना होता कामा नये,लोक सभागृहात येवून आपल्याला मारतील हिंस्त्र श्वानापासून धोका झाला तर त्याला मारावेच लागते.

मा.सभापती साहेब :- सध्याच्या ठेकेदाराला मुदतवाढ देण्यात यावी.

मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :- हिंस्त्र श्वानापासून धोका असल्याने कुत्र्ये मारणे बाबतचा अहवाल आरोग्य अधिकारी यांचे कडून आला पाहिजे.

मा.श्री.कुमार वाकळे :- सदरचा अहवाल उदया सकाळी माझ्या व्हॉटसअपवर हा आदेश पाठवा.

मा.श्री.गणेश भोसले :- मोकाट कुत्र्या बरोबरच मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा लागेल. आज जे मोकाट फिरतात त्यांना कधी धरणार कोण धरणार ?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :-मा.जिल्हाधिकारी साहेब यांचे समवेत शहरातील गोठे पिंपळगाव येथे हलविण्या संदर्भातील प्रस्तावावर सही झाली आहे.सदरचा विषय मा. महासभेसमोर येणार आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- लवकरात लवकर कोंडवाडा सुरू करा, पांजारापोळ संस्थेशी चर्चा करा,त्यांना काय पैसे दयायचे ते संबंधीत जनावराचे मालकाकडून घेवून त्यांना दया, म्हणजे मनपावर आर्थिक बोजा पडणार नाही.

मा.श्री.योगीराज गाडे :-आपले शहर स्वच्छ केले तर मोकाट जनावरे होणार नाही, कचरा कुंडया भरून वाहतात.आपल्या महानगरपालिकेत डस्टबीन व कचरा गाडयावर खर्च होत नाही तोपर्यत हा प्रश्न सुटणार नाही. पाचगणी नगरपरिषदेने प्रत्येक १०० मी. वर डस्टबीन उपलब्ध करून दिले आहेत. लोकसंखे नुसार कचरा गाडया उपलब्ध करून दिल्या आहेत.त्याधर्तीवर आपल्यायेथे हा प्रयोग केल्यास कचरामुक्त शहर होईल.

मा.सभापती साहेब :- कचरा व कुत्र्यांवर संबंधीतांची बैठक लावा.

मा.श्री. मनोज कोतकर :- पुढच्या वेळेस जर यांनी कुत्रे धरले नाहीतर आम्ही पालिकेत कुत्रे आणू.

मा.सभापती साहेब :- पुढचे हेड घ्या.

"क" मनपा मालमत्ता व उपयोगिता सेवा यांचेपासून मिळालेले उत्पन्न अ.नं.१ मधील अ,ब,क वाचन केले.

मा.श्री.गणेश भोसलेः- महानगरपालिकेने ज्या ज्या ठिकाणी घरकुल योजना राबविल्या आहेत.त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या महानगरपालिकेच्या जागेमध्ये महानगरपालिकेमार्फत गाळे बांधण्यात यावेत.याव्दारे महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळणार आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- नेहरू मार्केट व प्रोफेसर कॉलनी चौक तसेच बेग पटांगण ,वसंत टॉकिज समोरील जागेत महानगरपालिका अथवा बी.ओ.टी. तत्वावर गाळयांचे बांधकाम करून भाडेतत्वावर देण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- नेहरू मार्केट व प्रोफेसर कॉलनी चौक तसेच बेग पटांगण ,वसंत टॉकिज समोरील जागेत महानगरपालिका अथवा बी.ओ.टी. तत्वावर गाळयांचे बांधकाम करून भाडेतत्वावर देण्यात यावेत. गाळे हस्तातंरण फी ची प्रक्रिया प्रभावीपणे चालू असल्याने रू.५०लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी चालू आहे का ?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- रक्त पेढी चालू आहे.त्यांना पॅथॉलॉजिस्ट व बी.टी.ओ. पाहिजे आहे.

मा.श्री.गणेश भोसले :-आमच्या माहितीनुसार रक्तपेढी बंद आहे. रक्तपेढीत फोन लावण्यात आला.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- कम्पौन्टसाठी चार बी.टी.ओ. लागणार आहेत. मशीनचे काम चालू आहे. पण संथ गतीने चालू आहे.

मा.श्री.मनोज कोतकरः- मा.आयुक्त यांनी मागील वेळी शास्ती माफीचा निर्णय घेतला होता.त्यावेळी मोठयाप्रमाणात घरपट्टी व पाणीपट्टीची वसुली  झाली होती. हे आर्थीक वर्ष संपणार असल्याने उर्वरित दिवसांकरीता शास्तीमाफीचा निर्णय मा.आयुक्त साहेबांनी घ्यावा हि विनंती करण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब :- घरपट्टी व पाणीपट्टी शास्तीमाफीचा निर्णय मा.आयुक्त साहेबांनी घ्यावा

मा.सौ. दिपाली बारस्कर :- मागील तीन वर्षा मधील उत्पन्न पहाता "अनधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे " या लेखाशिर्षा मध्ये रूपये १ कोटी दर्शविण्यात आले आहे.त्यामध्ये रूपये ३ कोटी ५० लाखाने वाढ करून रक्कम रूपये ४.५० कोटी दर्शविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- "अनधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे " या लेखाशिर्षा मध्ये रू.३ कोटी ५० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब : मालमत्ता नाव नोंदणी फी बाबत माहिती सांगा.

रिव्हीजन विभाग श्री. झीने :- स्थावर मालमत्ता खरेदीच्या १% हस्तांतरण फी आकारणी करून महानगरपालिकेमध्ये नांव लावण्यात येते.

मा.श्री.कुमार वाकळे :-आपले कर्मचारी नांव लावतात का ? ६-६ महिने नागरिक महानगरपालिकेमध्ये नाव लावण्यासाठी चकरा मारतात.

रिव्हीजन विभाग श्री. झीने :- संबंधीत लिपिकास आपण सूचना दिलेल्या आहेत. नागरीकांच्या या बाबत तक्रार प्राप्त झाली तर अशा संबंधीत कर्मचा-यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल.

मा.श्री.कुमार वाकळेः- संबंधीत कर्मचारी मालमत्ता धारकास पेन्सिलने काही रक्कम लिहून दाखवतात. एवढी आकारणी होईल यातील आर्धी रक्कम दिलीतर तर रक्कम कमी होईल अशा प्रकारे पैशाची मागणी करतात. ज्या दिवशी नोंदणीला येईल त्याच दिवशी नोंदणी करावी.

मा.श्री.श्रीकृष्ण भालसिंग ,आयुक्त :- जी आय एस सर्व्हे करायला पाहिजे.

मा.श्री.कुमार वाकळेः- चार प्रभाग अधिका-यांनी या कामावर देखरेख करून महानगरपालिकेकडे कर्मचारी उपलब्ध नसल्यास मानधनावर कर्मचारी नेमणुक करा त्यांच्याकडून भाडेकरी व कमर्शिअल जागा असल्याबाबत शोध मोहिम राबविण्यात यावी.

रिव्हीजन विभाग श्री. झीने :- बांधकाम परवानगी नंतर एक वर्षानंतर आकारणी चालू होते.

मा.श्री.गणेश भोसले :- अशी यंत्रणा पाहिजे एक वर्षानंतर आकारणी झालीच पाहिजे.

रिव्हीजन विभाग श्री.झीने :- बांधकाम परवानगीचे नकाशे प्रभाग अधिकारी यांचेकडे जातात. त्यांनी आकारणी केली पाहिजे.

मा.श्री. गणेश भोसले :- जी.आय.एस. सिस्टीमचे कर्मचारी हे सेटलमेंट करायचे

रिव्हीजन विभाग श्री. झीने :- ५० हजार फॉर्मची छाननी करण्याचे काम चालू आहे.

मा.सभापती साहेब :- कॉस चेकींग करावे लागेल.

मा.श्री. योगीराज गाडे :- दंड खुप लागल्याने नागरिक कर भरत नाही . आयुक्त साहेब तुमच्या अधिकारात शास्ती माफी करता येईल. त्यामुळे नागरिक घरपटटी भरतील सर्व नगरसेवकांचे वतीने विनंती १ एप्रिल पासून शास्ती माफी करावी.

मा.श्री.गणेश भोसले :-आमची सर्व नगरसेवकांची मागणी आहे. शास्ती माफी करा.

मा.श्री.अविनाश घुलेः- नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा मालमत्ता धारकांचा शोध मोहित हाती घेवून त्यांच्या प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून घरपट्टी उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होईल. यामध्ये रक्कम रूपये ५० लाखांनी वाढ सुचविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- नविन घरांना घरपटटी लागु करून "मालमत्ता नाव नोंदणी फी " या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :-मा.शासन निर्णयानुसार गुंठेवारी योजना या मध्ये रक्कम रूपये ३ लाख वाढ करण्यात यावी.

मा.श्री.सभापती साहेब :- "गुंठेवारी विकास नियमिती करणे " यालेखाशिर्षामध्ये रूपये ४ लाख वाढ करण्यात यावी.

मा.श्री.योगीराज गाडे :- स्वच्छ सर्व्हेक्षण मध्ये आपला खालून पहिला नंबर आला आहे. प्रशासनाने गांर्भीर्याने घेतले पाहिजे. मनपाचे प्रिमायमेस स्वच्छ नाही .आयुक्त व उपायुक्तांनी गार्भीर्यने घेणे गरजेचे आहे. सुधारणा झाली पाहिजे.

मा.सौ. दिपाली बारस्कर :- मंगल कार्यालयाला पार्किग नाही. रस्त्यावर वाहने लावतात. त्यांच्या कडून चार्जस घ्यायला पाहिजे.

मा.सभापती साहेब :- जाहिरात बोर्ड बाबत माहिती दया.

जाहिरात क. व. विभाग श्री.सुबोध देशमुख :- मनपाने टेंडर काढले आहे. सध्या प्रति बोर्ड १२५००/- रूपये आकारता, दोन वर्षाकरता परवानगी देतो. ५ ते ७ लाख रूपये उत्पन्न येते .

मा.सभापती साहेब :- खाजगी जागांवरील जाहिरातींचे काय ?

मा.श्री. कुमार वाकळे :- आपण किती साईजच्या बोर्डला परवानगी देतो.

जाहिरात क. व. विभाग श्री. सुबोध देशमुख :- ४०X२० च्या बोर्डला परवानगी देवू शकतो.

मा.श्री.कुमार वाकळे :-४०X२०यापेक्षा मोठमोठे बोर्ड शहर हद्दीमध्ये आहेत.परंतु त्यांना परवानगी ४०X२० ची असतांना याच्यावर कारवाई कोण करणार ?

जाहिरात क. व. विभाग श्री. सुबोध देशमुख :- अतिक्रमण विभागाकडून कारवाई करणार.

मा.श्री.कुमार वाकळे :- जाहिरात बोर्ड ४०X२० पेक्षा मोठे बोर्ड नाहीत का ?

मा.अति. आयुक्त श्री.वालगुडे :- साईज पेक्षा मोठे बोर्ड आहेत त्यांचा तरी रिपोर्ट दिला का ?

मा.सभापती साहेब :- ई - निविदा काढली का ? त्यास मुदतवाढ दिली का ?

मा.श्री.कुमार वाकळे :-४०X६०,४०X८० मोजमापाचे बोर्ड अनेक ठिकाणी दिसुन येतात. खाजगी जागांच्या मालकावर काय कारवाई केली .स्पॉटवर बोर्ड पाहायला तुम्ही जाता का ?

जाहिरात क. व. विभाग श्री. सुबोध देशमुख :-कर्मचारी संख्या अपुरी आहे. मी एकटा पाहणीसाठी जावू शकत नाही.

मा.श्री. कुमार वाकळे :- मी जे बोर्ड सांगतो, ते दर्शनी भागातले आहे. याचा रिपोर्ट पाठवायला पाहिजे.

मा.सभापती साहेब :- पुढच्या मिटींगला सर्व्हे करून रिपोर्ट दया, मागच्या वेळेस ई - निविदा काढणे बाबत चर्चा झाली होती.

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- यांचेकडे लोड असेल तर दुस-याकडे जबाबदारी दया.

जाहिरात क.व.विभाग श्री. सुबोध देशमुख :-उपायुक्त (कर) यांचेकडे मी सर्व्हेच्या यादया दिल्या आहे.

मा.श्री. कुमार वाकळे :- .जाहिरात विभाग यांनी दिलेल्या सर्व्हेच्या यादीवर लहारे साहेब आठ दिवसांत कारवाई करावी. नियमानुसार त्यांना दंड आकारणी करायची कि जादा असलेली बोर्ड ची साईज कट करायचा का ? या बाबत निर्णय घ्या. व त्यांना पुन्हा परवानगी दयायची नाही ते नियमानुसार पहा.

मा.सौ.सोनाली चितळे :- शहराच्या भौगोलीक रचनेचा विचार करता सध्याच्या डिजीटल युगात जाहिरातीवर व्यावसायीकांचा जास्त प्रमाणात भर असतो.त्यामुळे जाहिरात बोर्ड जागा भाडे या लेखाशिर्षातर्गत वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- जाहिरात बोर्ड जागा भाडे या लेखाशिर्षातर्गत रक्कम रूपये ६ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.,

मा.सौ.संध्या पवार :- म.न.पाच्या मालकीच्या किती शाळा आहेत.त्यापैकी किती शाळा भाडया दिल्या आहेत ? ज्यांच्या कडे भाडे थकले आहे त्यांच्यावर त्वरीत कारवाई करून वसूली करण्यात यावी.अन्यथा त्यांच्यावर कडक करावाई करण्यात यावी. रू.२० लाखाची वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- थकबाकीदारावर कडक करावाई करण्यात यावी. मनपा शाळा भाडेपासून उत्पन्न या लेखाशिर्षातंर्गत रू.२० लाखाची वाढ करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले :- मा.महासभेमध्ये झालेल्या ठरावा नुसार शहरात विविध ठिकाणी पे ॲण्ड पार्क करीता जागा निश्चिती झाली असून या लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात उत्पन्न मिळणार असल्याने या लेखाशिर्षा मध्ये १० लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- शहरात विविध ठिकाणी पे ॲण्ड पार्क करीता जागा निश्चिती झाली असून या लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात उत्पन्न मिळणार असल्याने पे ॲण्ड पार्क पासुन उत्पन्न या लेखाशिर्षा मध्ये १० लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात यावी.

मा.श्री. कुमार वाकळे :-"मोबाईल टॉवर प्रशासकीय शुल्क" या लेखाशिर्षातंर्गत २५ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- "मोबाईल टॉवर प्रशासकीय शुल्क " या लेखाशिर्षातंर्गत रू. २५ लाखाची वाढ करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले:-अहमदनगर शहर हद्दीमध्ये गॅन्ट्रीज मोठया प्रमाणात बसविण्यात आल्या आहेत. जाहिरातीच्या माध्यमातून रॉयल्टी पोटी उत्पन्न मिळेल वाढ सुचविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-"गॅन्ट्रीज रॉयल्टी " या लेखाशिर्षातंर्गत जाहिरातीच्या माध्यमातून रॉयल्टी पोटी उत्पन्न मिळेल रू.२० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे

अ.नं. ४ उदयान विभाग इतर उत्पन्न

रिव्हीजन विभाग श्री. झीने :- रस्ता कर रेटेबल व्हॅल्युच्या २ टक्के ने आकारतो

मा.श्री. योगीराज गाडे :- मनपाच्या ओपन स्पेसमध्ये हॉकर्स झोन निर्माण करावे. मनपाच्या जागा पडून आहे.संध्या ५ ते ९वाजेपर्यत परवानगी देता येईल पालिकेला उत्पन्न मिळले.

अ.नं. ८ ग्रंथालय फी नंबर ९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७

अ.नं. १७ पुढे वाचन , अ.नं. पुढे चालू ३३,३४,३५

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- मोबाईल टॉवरचे मागील तीन वर्षात शुन्य उत्पन्न आहे.

नगररचनाकार श्री. जोशी :- मागच्या वर्षी रूपये ८० लाख धरले

मा.आयुक्त साहेब :- आपल्या शहरात किती टॉवर आहेत. किती टॉवरला परवानगी दिली.

नगररचनाकार श्री.जोशी:-एकुण२८५आसपास मोबाईल टॉवर आहे.७०टॉवरला परवानगी दिली आहे.

मा.सभापती साहेब :- दंडात्मक प्रोसेस केली का, रेग्युलाईज करायला आल्यानंतर दंड आकारून रेग्युलराईज करतो करण्यात येते का ?

मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :-३ वर्षात रेग्युलराईज ला कोणी आलेला नाही का ? रूपये ७५ लाखाला बेस काय आहे.

नगररचनाकार श्री. जोशी :- ७५ टॉवर रेग्युलराईजच्या हिशोाबाने धरले आहे.

सार्वजनिक वृक्षतोड टोकन रक्कम रू.१०००/- ठेवले आहे. रू.६५ कोटी ५० लाख तरतुद पान नं.१० अनुदाने व अंशदानाची रक्कम रू.९२ कोटी २३ लाख मनपा गुंतवणूकीतून व्याज संकीर्ण इ अ.नं. ११ रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर

मा.श्री.कुमार वाकळे :- बिल्डर लोकांनी रात्रीच्यावेळी जे.सी.बी.ने रस्ता खोदतात १२ ब्रासच्या गाडया आणतात त्यामुळे रस्ते खराब होतो. त्यावर कोण कारवाई करणार.

मा.श्री.योगीराज गाडे :- प्रायव्हटे बिल्डरने रस्ता फोडलातर शासकीय दरानुसार की महानगरपालिका ठरावानुसार दंड आकारला जातो.

मा.श्री.कुमार वाकळे :- बिल्डीरने रस्ता खराब केला. नवीन रस्ता केलेला खराब केला तर संबंधीत बिल्डरवर कारवाई करा.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- संबंधीत इंजि. यांनी कारवाई करावी. मनपाच्या ठरावानुसार प्रति मीटर रू.१५०० दराने दंड आकारला जातो.

मा.श्री.कुमार वाकळे :-मोरया पार्क जवळचा रस्ता उरवडून गेला इंजि.श्री.पारखी यांनी कारवाई करावी.

मा.सभापती साहेब:- केबल टाकणे, पाण्याची लाईन टाकणे व दुरूस्त करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करता रस्ता फोडणे करिता शुल्क आकारले जाते प्रभाग अधिकारी तसेच स्वच्छता निरीक्षक यांनी पहाणी करून महसुल वाढविणे करता प्रयत्न करावेत.घरोघरी पाइप लाईन व्दारे घरगुती गॅस कनेक्शन नव्याने सुरू होणार असल्याने रस्ते खोदाई होणार असल्याने रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर या लेखाशिर्षा मध्ये रूपये १ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.

१५अ बोरगे बायोमेडीकल वेस्ट विल्हेवाटी साठी रक्कम आहे त्यानुसार बुरूडगाव कचरा डेपो येथे विल्हेवाट लावली जाते. सध्या ५ वर्षात करीता ठेका दिला आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :-म.न.पा हद्दीतील सर्व दवाखाने,प्रसुतिगृहे, हॉस्पीटल,नर्सिग होम्स, प्रयोगशाळा,इत्यादीपासून गोळा होणारा जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे, प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी काम करीत आहे. उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व दवाखाने,प्रसुतिगृहे, हॉस्पीटल, नर्सिग होम्स, प्रयोगशाळा,इत्यादीपासून गोळा होणारा जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी काम करीत आहे. डॉक्टरांकडून जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता आकारण्यात येणा-या दरामध्ये सुरूवातीला ३० टक्के दर वाढ व दर २ वर्षानी त्यामध्ये १० टक्के दरवाढ होणार असल्याने जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट या पासुन मिळणा-या उत्पन्नामध्ये रूपये १० लाखांनी वाढ करण्यात यावी.

१५ ब घनकचरा विल्हेवाट पान नं.१० वर अ.नं.२७ पर्यत वाचन भाग-१ एकत्रिकरण एकुण जमा रूपये २६९ कोटी

मा.श्री. मनोज कोतकर :- वाहन भाडयापासून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मनपाच्या वाहनाची संख्या पहाता प्रत्येक वाहनाचा विचार करता व स्वच्छ भारत अभियांन अंतर्गत निधी मंजूर झालेला असल्याने मोठ्या प्रमाणात वाहने खरेदी होणार आहेत. घन कचरा संकलन व वाहतूक अंतर्गत मनपा वाहन भाडयापासून उत्पन्नामध्ये रू.५० लाखाची वाढ करण्यात येत आहे.

मा.श्री. गणेश भोसले :- अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम उत्पन्नामध्ये रूपये १ कोटीने वाढ करण्यात यावी.

महसूली खर्च "अ" वाचन

मा.सौ.दिपाली बारस्कर:- शहरामध्ये विविध सामाजिक संस्था सामाजिक शैक्षणिक धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करतात याकामी येणारा खर्च संस्थांना परवडणारा नसतो शहराचा नाव लैकीक वाढीसाठी या संस्था कायम प्रयत्न करतात यास्तव रू.६ लाख दर्शविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-शहराचा नावलैकीक वाढीसाठी या संस्था कायम प्रयत्न करतात यास्तव सामाजिक संस्थांना देणगी यालेखाशिर्षामध्ये रू.६ लाख तरतूद करण्यात यावी.रसिक ग्रुप,अ.नगर व नगर जल्लेष (ट्रस्ट)अ,नगर या सामाजिक संस्थांना मागणी पत्रानुसार अनुक्रमे रू.१ लाख ५०हजार देणगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.याबाबत संबंधीत संस्थाकडून कागदपत्राची पुर्तता करून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.सदरचा खर्च सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.

प्र.नगरसचिव श्री.तडवी :-सामान्यप्रशासनविभाग क्र.८ मधील लेखाशिर्षामध्ये "महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ खर्च" बदल करून "महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ चहापान खर्च" असे लेखाशिर्ष दर्शविण्यांत यावे. व यालेखाशिर्षातंर्गत रूपये ५० हजाराने वाढ करण्यात यावी.तसेचनगरसचिव विभागाकडील लेखाशिर्षामध्ये आकस्मिक खर्च या लेखाशिर्षा मध्ये बदल करून नगरसचिव विभाग,आकस्मिक खर्च /झेरॉक्स खर्च असे लेखाशिर्ष दर्शविण्यात यावे. तसेच मा.महासभा, मा.स्थायी समिती , इतर प्रभाग समिती, अतीथ्ी चहापान खर्च या लेखाशिर्षामध्ये बदल करून मा.महासभा,मा.स्थायी समिती ,इतर प्रभाग समिती, अतीथ्ी चहापान,अल्पोपहार खर्च दर्शविण्यात येवून या लेखाशिर्षाअंतर्गत रककम रूपये ४ लाखांची वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- सामान्य प्रशासन विभाग क्र.८ मधील लेखाशिर्षामध्ये "महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ खर्च" बदल करून "महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ चहापान खर्च" असे लेखाशिर्ष दर्शविण्यांत यावे. व या लेखाशिर्षातंर्गत रूपये ५० हजाराने वाढ करण्यात यावी. तसेच नगरसचिव यांनी केलेल्या सुचने नुसार लेखाशिर्षामध्ये बदल करून वाढविण्यात आलेली रक्कम रू.४लाख वाढविण्यात येत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे:-मा.महाराष्ट्र शासनाने ७वा वेतन आयोग लागू केला आहे.त्यानुसार महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांना ७वा वेतन आयोग लागू करण्याकरीता आवश्यक असलेल्या वाढीव निधीची तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांना ७वा वेतन आयोग लागू करण्याकरीता आस्थापनावरील वेतनाच्या प्रत्येक विभागाच्या लेखाशिर्षाअंतर्गत ७ टक्के प्रमाणे वाढ करण्यात यावी. याकरीता येणा-या रकमेची तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब **:-** अहमदनगर शहर व नजीकच्या परिसरामध्ये ऐतीहासीक,धार्मीक व सांस्कृतीक अशा विविध महत्वपूर्ण बाबी असून या महत्त्वपूर्ण स्थळांची महिती होण्याच्या दृष्टिने पर्यटन विकासास चालना देणे गरजेचे आहे. याअंतर्गत अ) अहमदनगर शहराचा वर्धापन दिन (२८ मे)महानगरपालिकेच्या वतीने साजरा करण्यात यावा. ब) शहरात येणा-या रस्त्यांवर सचित्र माहिती असलेले दिशादर्शक बसवावेत. क)महानगरपालिकेच्या वतीने "नगर दर्शन " उपक्रम राबविणे कामी "नगर शहर पर्यटन विकास "नवीन लेखशिर्ष निर्माण करण्यात येउन त्यामध्ये रूपये ५ लाख रकमेची तरतूद करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले :-अहमदनगर शहराचा नावलौकिक देशामध्ये गाजविणा-या कलावतांचा गैरव आपल्या मायभुमीत झाला पाहिजे.मागील काही अनुभव लक्षात घेता अशा कलाकार किंवा

उल्लेखनिय कामगीरी करणा-यांची संख्या नगर शहरामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.त्यांचा मानसन्मान करणे हे महानगरपालिकेचे आदय कर्तव्य आहे."उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव"या लेखाशिर्षामध्ये रूपये १लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी तसेच आपल्या महानगरपालिकेमधील अधिकारी व कर्मचा-यांचे मुले व मुलींसुध्दा आजच्या स्पर्धेच्या युगात उल्लेखनिय कामगीरी करीत आहेत.त्यांचे पालक हे आपल्या संस्थेमध्ये काम करीत असल्याने आपल्या मनपाचे सुध्दा नावलौकिक वाढते.त्यामुळे त्यांचा योग्य तो सन्मान करणे आवश्यक आहे.तसेच इतर पाल्यांचा सुध्दा आत्मविश्वास वाढून ते चांगली कामगीरी बजवण्यास प्रोत्साहन मिळेल.आपल्या महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील ब्लड बॅंक येथील कार्यरत स्टाफ नर्स सौ.विद्या सुनिल वैदय यांचा मुलगा चि. अक्षय सुनिल वैद्य हा दिव्यांग असून सुध्दा याने सर्वसामान्य मुलांच्या सायकल स्पर्धे मध्ये भाग घेवून प्रथम क्रमांक मिळविला तसेच चित्रकला स्पर्धा,पोहण्याच्या स्पर्धा,नाटयकलाकृती अशा प्रकारे विविध स्पर्धे मध्ये विशेष प्रविण्य मिळाले असून त्याचा दखल मा.राष्ट्रपती मा.प्रणव मुखर्जी यांनी घेतली व त्यांच्या शुभहस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.या त्याच्या विशेष कार्याची दखल महानगरपालिकेने क्रमप्राप्त आहे.चि.अक्षय सुनिल वैद्य या महानगरपालिकेच्या कर्मचा-याच्या मुलास उत्तेजनार्थ रक्कम रूपये ५० हजार देवून गौरव करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहराचा नावलौकिक देशामध्ये गाजविणा-या कलावतांचा गैरव आपल्या मायभुमीत झाला पाहिजे यास्तव ."उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव"या लेखाशिर्षामध्ये रूपये १ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी. चि. अक्षय सुनिल वैद्य हा दिव्यांग असूनसुध्दा याने सर्वसामान्य मुलांच्या सायकल स्पर्धे मध्ये भाग घेवून प्रथम क्रमांक मिळविला तसेच चित्रकला स्पर्धा,पोहण्याच्या स्पर्धा,नाटयकलाकृती अशा प्रकारे विविध स्पर्धे मध्ये विशेष प्रविण्य मिळाले असून असून त्याचा राष्ट्रपती मा.प्रणव मुखर्जी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. चि.अक्षय सुनिल वैद्य याचा महानगरपालिकेमार्फत सुध्दा सत्कार करून त्यास उत्तेजनार्थ रक्कम रूपये ५० हजार देवून गौरव करण्यात यावा.

पान नं.३७ महसूली जमा "क" वाचन

सेष्टीक टॅंक -३५ हजार दुरूस्ती

ब पाणीपुरवठा विभाग वाचन पुढे चालू

पाणीपुरवठा एकुण उत्पन्न रू.६० कोटी , ६३ कोटी ३ लाख

मा.सभापती साहेब :- मीटरद्वारे मिळणारे उत्पन्न रूपये ४२ कोटी माहिती दया.

पाणी पुरवठा विभाग श्री. काकडे :- जिल्हा परिषद पूर्वी ग्रामपंचायतील पाणी देत होतो त्या ग्रामपंचायतीलहून रूपये १ कोटी १२ लाख मिळाले आहे व्याज न विलंब आकार धरून रूपये ४२ कोटी तरतुद झाली आहे.

पान नं.४० भांडवली जमा वाचन सुरू अ.नं. १ ते १३ अ,ब,क

मा.श्री. कुमार वाकळे :- विकासभार निधी कोठे वापरता येतो. आता शिल्लक आहे का ?

नगररचनाकार श्री. जोशी :- विकासभार निधी ७५% भुसंपादनासाठी २५% विकास योजना साठी वापरता येतो.

अर्थ विभाग श्री. लोंढ :- त्यामध्ये २ प्रकार १००% जमा आला तर ७५% भु.सं. शिल्लक रू. १० ते १२ कोटी आहेत.

मा.श्री. कुमार वाकळे :- आता भूसंपादन करू शकतो का

अर्थ विभाग श्री. लोंढे :- करू शकतो. भुलमूत सुविधा विकास निधी वाचन पुढे करा.

मा.सौ. दिपाली बारस्कर :- अंगणवाडया दोन दोन वर्ष बांधुन होत नाही, दोन रूम बांधायला २-२ वर्ष लागले. पाण्याची टाकी बसाविल्या आहेत ,पण पाण्याची सोय नसते. व्ययस्थीत सुविध देत नाही, अंगणवाडीस मनपाने मोफत पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन दयावे.

शाखा अभियंता श्री. पारखे :- ठेकेदाराला दंड केला आता काम पुर्ण झाले आहे, कामाच्या १% दंड केला जातो.

मा.श्री. योगीराज गाडे :- स्टेशन रोड वरील मनपाची इयत्ता १ ते ७ पर्यतची शाळा बंद केली असल्याचे समजते माहिती दया.

शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी श्री.पठाण :-अदयाप शाळा बंद केलेले नाही, या शैक्षणिक वर्ष अखेर रक्कम ठेवण्यात यावी असे मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी आदेश दिले.

मा.श्री. योगीराज गाडे :- शाळा कायम सुरू ठेवण्यासाठी प्रस्ताव सादर करा, शिक्षकांचे पद मंजूर करून दया. गोरगरीबंची मुले तेथे शिकतात.

मा.सौ. दिपाली बारस्कर :- मनपाची सावेडीतील शाळेची दुरूस्ती करा.

मा.श्री.गणेश भोसले :-एखादया खाजगी संस्थेला शाळेची जागा देवून तेथील विदयार्थी शाळेमध्ये कन्टोन्यू होतील.

शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी श्री.पठाण :- शाळा सुरू ठेवण्याकरीता पदे मनपा आस्थापनावर घ्यावी लागतील.

आस्थापना प्रमुख श्री.लहारे :-पद मंजुरीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवला होता, पण मंजुरी दिली नाही.

मा.श्री. योगीराज गाडे :-आता काय करता येईल.

आस्थापना प्रमुख लहारेः- त्या शाळेतील विद्यार्थी जवळच्या शाळेत शिफ्ट करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी आदेश दिलेले आहेत.

मा.आयुक्त साहेब :- पदच मंजुर नाही त्यामुळे चालू ठेवता येत नाही.

मा.श्री. योगीराज गाडे :- मनपाचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे, पद भरती करीत नाही.

मा.आयुक्त साहेब :- सदरचा प्रस्ताव तपासून पाहू, असणा-या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करून शाळा कशी चालू राहिल हे पाहू.

मा.श्री.गणेश भोसले :- शिक्षण मंडळ काहीच काम करत नाही,त्यांनी शाळा कशा प्रकारे चालू राहिल हे पाहिले पाहिजे, वर्षानुवर्षे पटसंख्या कमी होत आहे.

मा.उपायुक्त (सा.):- रेल्वे स्टेशन शाळेमध्ये झालेली भरती प्रक्रिया बेकायदेशीर पध्दतीने झाली आहे. त्यांची नेमणूकच चुकीची झाली आहे. तत्कालीन सभापतींकडून रक्कम वसुलीची नोटीस दिली. भविष्यात पद मंजुरीसाठी महासभेमार्फत शासनाकडे पाठवावे लागेल. आता कामावर असलेल्या शिक्षकांना कंटीन्यू करता येणार नाही. ते कोर्टात गेलेले आहे. त्यांची नेमणूकच बेकायदेशीर आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- महानगरपलिकेच्या शाळेत जे विद्यार्थी शिकतील त्यांना मनपाच्या सेवेत घेता येईल अशी टि.व्ही. वर बातमी आली होती. अश्याप्रकारे काही उपक्रम करता आला तर पहा.

मा.श्री.श्रीकृष्ण भालसिंग,आयुक्त :-औरंगाबादला शाळेसमोर बगीच्या तयार करणे उपक्रम राबविणे बाबत कार्यक्रम राबविण्यात आले.याधर्ती वर आपल्या येथील शाळेमध्ये उपक्रम राबविल्यास पटसंख्या वाढेल.

मा.सभापती साहेब :- अमृत योजनेतील कामाची माहिती दिली.

पाणी पुरवठा विभाग श्री. काकडे :- मुळ डॅम येथील रॉ वॅाटर ,ग्रॅव्हटी, GSR रिपेअरीग २५ ते २८% काम पुर्ण झाले आहे. ८ दिवसापूर्वी मा. जिल्हाधिकारी यांनी मिटींग घेतली बारचार्टनुसार काम मुदतीत ३१/१०/२०१९ पर्यत पुर्ण करणेबाबत सूचना दिल्या आहेत.

मॅके.इंजि.श्री.निकमः-अमृत सोलर प्रकल्पासाठी १६.७८ कोटी अनुदान मंजुर झाले आहे.महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार एजन्सी म्हणुन नेमणुक केली आहेराज्य शासनाची मंजुरी घेवुन निवीदा प्रसिध्द करण्यात येणार होती दरम्यानच्या काळात मा.राज्य शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार एजन्सी नियुक्ती रदद करुन मेडाची नेमणुक केली आहे मेडाने डीपीआरची प्रोसेस चालु केली असुन ती अंतिम टप्प्यात असुन शासनाचे कमीटीकडे गेली आहे.

मा.सभापती साहेब :- मेडाकडे पाठपुरावा करा.

पान नं.४२ अ.नं.४२ अ.नं.४१ वर पुढे चालू

मा.श्री. कुमार वाकळे :- अमृत योजनेतील गार्डनबाबत- ज्या गार्डनला कंपौड आहे तेच गार्डन आम्ही प्रस्ताव दिले ज्यावेळी प्रस्ताव दिले त्यावेळेस तार कंपौड होते आता ते कोणी ताडले हे माहिती नाही.आता त्या ठिकाणी तार कंपौड राहिले नाही ज्या उदयानाला तार कंपौड राहिले नाही अशा ठिकाणची तरतुद आजच्या स्थायी समितीमध्ये मंजुरी देण्यात यावी.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- कंपौड मनपा फंडातून केले तर वर्क मात्र करता येईल.

मा.सभापती साहेब :- कंपौड करून नंतर त्या ठेकेदाराला काम करण्यास सांगण्यात येईल

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- उदयान विकसीत करणे या हेडवरील तरतुदी वाढवावी लागेल.

प्र. शहर अभियंता श्री. सोनटक्के :- वर्षासाठी १० लक्ष तरतुद केली आहे.

मा.श्री. कुमार वाकळे :- माझ्या प्रभागात ४ उदयान आहेत.

मा.सभापती साहेब :- उदयान विकसीत करणे रू१० लाखाच्या ऐवजी रू.४० लाख करण्यात यावी.

नाविन्यपुर्ण योजना अनुदान पुढे वाचन चालू

मा.श्री. कुमार वाकळे :- जे सरकारी जागावर शौचालय बांधले तो योजना कोणती स्वच्छ महाराष्ट्र योजनेतून बोल्हेगाव शाळेजवळील शौचालय जॉईट केलेले नाहीत.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- संबंधीत स्वच्छता निरीक्षक यांना सांगतो.

अ.नं.४७ पुढे चालू भांडवले जमा अ ३८३ कोटी

पान नं.५५ भांडवले जमा क जलनिस्सारण एकुण रू.८० कोटी १ लाख प्रकल्प अहवाल पान नं.५५ पुढे चालू

मा.श्री.कुमार वाकळे :- फेज- टू योजना सर्व्हे नंतर ब-याच ठिकाणी नवीन कॉलनी झाल्या आहेत. नवीन भागामध्ये ज्या कॉलनीमध्ये फेज-टू नाही अशा ठिकाणी फेज २ सोडुन नविन पाईप लाईन टाकणे यातुन तरतुद करावी.

पाणी पुरवठा विभाग श्री. काकडे :- तसा सर्व्हे करून खर्च बाजू मध्ये टाकता येईल.

मा.सभापती साहेब :- नेहरू मार्केटची सद्यस्थितीत काय आहे.

मा.श्री. गणेश भोसले :- मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईतुन किती प्रत्यक्षात जमा झाले.

रिव्हिजन विभाग श्री. झिने :- दंडात्मक वसुली टी.पी.चा विषय आहे

मा.सभापती साहेब :- मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले:-शास्तीमाफी करायची नसेल तर तेवढी वसुल करून दाखववावी.तुम्ही वसुल करून देणार असाल तर अडचण नाही. तेवढी वसुल करणार असे प्रभागअधिकारी यांचे लेखी घ्या

मा.श्री.योगीराज गाडे :-ॲक्टनुसार आयुक्तांना शास्ती माफीचे अधिकार आहे प्रभाग अधिकारी यांना विचारण्या पेक्षा आयुक्तांनी त्यांचा अधिकार वापर करुन शास्ती माफी करावी.

मा.श्री. कुमार वाकळे :-मा.महासभेत विषय घ्या. मागे ज्या वेळेस शास्ती माफ केली त्यावेळेस फरक पडला होता.

श्री. जितेंद्र सारसर :- एप्रिल , मे मध्ये एकुण वसुल रू. ८ कोटीने वाढले होते.

मा.श्री. कुमार वाकळे :- ज्या ठेकेदाराचे मनपाकडे बिले अडकले आहेत त्या ठेकेदाराचे म्हणणे असे आहे की त्यांचेकडे जी घरपटटी थकीत आहे ती घरपटटी मनपाकडील थकीत देणे असलेल्या बीलातुन जमा करुन घेण्यात यावी.समायोजन करण्यात यावे.

मा.श्री.श्रीकृष्ण भालसिंग ,आयुक्त :- त्यांना आपल्याला चेक दयावा लागेल आपण त्यांना चेक देवु परस्पर कट करता येणार नाही.

मा.श्री.कुमार वाकळे :- त्याने दुस-याची घरपटटी भरली तर आपले देणे कमी होईल.सगळयात सोपे आहे.जे ठेकेदार घरपटटी भरत नाही त्यांची कट करता येईल

मा.सभापती साहेब :- पार्ट पेमेंट करा आपण मागच्या वेळेस केलेले आहे.

मुख्यलेखा अधिकारी श्री. मानकर :- ज्याची घरपटटी माफ करायची त्याचेय नावे बील असावे दुस-याचे नावे देता येणार नाही स्वतःची कमी करता येईल.

मा.सभापती साहेब :- धोरणात्मक बाब असल्याने या विषयावर चर्चा करून ठेकेदाराचे देणे व बील नील होत असल्यास योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.श्री.श्रीकृष्ण भालसिंग ,आयुक्त :- वॉर्ड ऑफिस यांची मिटींग घेवून निर्णय घेवू.

मा.श्री. योगीराज गाडे :- ठेकेदाराचे बील निघत नसल्याने निधी लॅप्स होतो. १००% बिले त्याचवर्षी बीले निधाले पाहिजे अशी व्यवस्था करू नागरिकांना उत्तर देवू शकतो. नगरसेवक निधी १००% वापरला जात नाही यामुळे नागरिकांचा अपमान होतो.नगरसेवक निधीतील ७३ नगरसेवकांचे निधी त्याच वर्षी बिले निघाली पाहिजे. सभापती साहेब यांनी रूलींग दयावे.

मा.सभापती साहेब :- या काळात तरतुद केलेली आहे प्राधान्याने बीले काढून दया.

मा.श्री. गणेश भोसले :- १० महिने झाले आमचे मानधन थकले आहे महिना भरात मानधन दिले नाही तर आम्ही लॉक लावू.

मा.उपायुक्त साहेब :- रि-ए प्रोप्रिएशन झाल्यानंतर संपूर्ण देण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- नगरसेवक स्वेच्छ निधीतील बिले प्राधान्याने दया.

मा.श्री. योगीराज गाडे :- इलेक्ट्रीकचे मटेरियल स्वखर्चातुन घ्यावे लागले.

मा.सभापती साहेब :- इले. विभाग पुरवठादार मयत आले आहेत लवकर दुसरे टेंडर काढावे लागेल.

मा.श्री. गणेश भोसले :- मागील वर्षी तरतुद रूपये ५० लाख केली होती.त्याचा कसा विनीयोग झाला याची माहिती दया.

श्री. बल्लाळ :- विदयुत साहित्य रूपये ३२ लाखाचे मटेरियलचे बीले दिले. उर्वरित बीले चालुतुन दिले आहेत.सध्या स्पील ओव्हरसाठी स्वंतत्र तरतुद करण्यात आली आहे.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- विदयुत साहित्य खरेदी देयके, जनरेटर भाडयाने लावणे त्यांना जे काम करायचे ते करतात केडीएमसी मध्ये अकौंट विभागास चेंजेस करता येत नाही.

मा.श्री. गणेश भोसले :- रूपये ५० लाख वर्षभरात कसे खर्च केले याची मला माहिती दया.

मा.श्री.योगीराज गाडे :- इले. घोटाळयांनंतर इलेक्ट्रिकच्या प्रस्तावांना मंजुरी देणे थांबले आहे. नवीन प्रस्ताव स्विकारा व नियमानुसार मंजुरी देणेबाबत आदेश दया.

मा.सभापती साहेब :- विद्युत साहित्य खरेदी या लेखाशिर्षामध्ये रूपये १०लाखाची वाढ करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले :- रोग / आजार प्रतिबंधक उपाय म्हणून शहर हद्दीमध्ये फवारणी केली जाते परंतु खाजगी ठेकेदाराकडून संपुर्ण परिसरात फवारणी होत नाही. यास्तव लेखाशिर्षांतर्गत रू.१० लाखाने वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- हिवताप प्रतिबंधक योजना कंत्राटी पध्दतीने फवारणी करणे या लेखाशिर्षांतर्गत रू.१० लाखाने वाढ करण्यात यावी.

महसुली खर्च अ अंदाजपत्रक पान नं.१४ वाचन सुरू अ.क्र.२८

मा.श्री. कुमार वाकळे :- जीआयएस सिस्टीम किती काम झाले आहे.

संगणकविभाग श्री. साळी :-रूपये १ कोटी ५६ लाख टेंडर दिले होते. बेसमॅप क्लीअर,डिजीटआयजेशन १००% झाले आहे.युटीलीटीॲप-७०% काम पुर्ण प्रापर्टी टॅक्स सर्व्हे ८५००० मालमत्तांचा सर्व्हे पूर्ण झाला असुन ५० हजार प्रापर्टी रिव्हीजन विभागाकडे दिल्या आहेत संबधीत एजन्सीचे रु १ कोटी ५६लाख पैकी रु १ कोटी १० लाख देणे बाकी आहे जसे जसे काम पुर्ण होते तसे तसे पेमेंट अदा केले जाते.

मा.श्री.कुमार वाकळे:-त्यांचे सोबत असणा-या कर्मचा-यांना व्यवस्थीत काम करण्याच्या सुचना दया.

मा.सभापती साहेब :- सध्या काम का बंद आहे.

संगणक विभाग श्री. साळी :- पेमेंट साठी.रूपये ५० हजार प्रापर्टी तपासून रिव्हीजन विभागाकडे दिल्या आहेत डीपीलॅन मॅच होत नाही नगररचना विभाग व संबधीत संस्थेने एकत्र बसून मार्ग काढणे अपेक्षीत आहे.डिपीमॅन्युअल असतो व ही ॲक्च्युअल इमेज असते. स्टेसालाईटच्या कर्म-यांना कंपनीने इथे न ठेवता इतर ठिकाणी पाठविले आहे.

पान नं.१७ नगररचना पुढे वाचन पुढे चालू

नगररचनाकार श्री.जोशी:-सावेडी गावठाण या सिटीसर्व्हे झालेला नाही त्यासाठी हि तरतुदी ठेवली आहे.

मा.सभापती साहेब :- मा.शासनाकडुन सिटी सर्व्हेचे काम मोफत होणेच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यांत यावा तसेच याकामी महानगरपालिकेस खर्च करण्याच्या दृष्टीने रक्कम रु. २० लाखाने कमी दर्शविण्यात यावी, इले. साहित्य खरेदी साठी प्रस्ताव दया.

श्री. बल्लाळ :- निधी उपलब्ध झाला की तातडीने पुढची प्रोसेस करण्यात येईल

मा.श्री.अविनाश घुले :- हायड्रोलीक गाडीवर तसेच बांधकाम विभागाकडील ट्रॅक्टर दुरूस्त झाला परंतु दोन्ही वाहनांवर वाहनचालक नसल्याने ही वाहने वापरता येवु शकत नाही.

मा.उपायुक्त (सा.):-घ.क.व्य. विभागाकडील वाहनचालकाचे ठेकेदाराकडून ड्रायव्हर घ्या.

मा.श्री.कुमार वाकळे :-माझा प्रभाग क्रमांक ७असुन बोल्हेगाव ते सावेडी हे अंतर २ कि.मी. आहे .नागरिकांना वळसा घालुन ५ कि.मी जावे लागते.मधले अंतर फक्त २ कि.मी. आहे. रस्त्याच्या कडे लाईट नाही. अर्धा रस्ता मुख्यमंत्री सडक योजनेतुन झाला आहे.प्रश्न फक्त लाईटचा आहे. लाईटची व पोलची सुविधा दिली तर नागरीकांच्या रहदारीचे ५ कि.मी. अंतर कमी होवू शकेल. नागरिकांना दिलासा मिळेल.या कामा करीता बजेटमध्ये तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ७ मधील बोल्हेगांव ते सावेडी खंडोबा मंदिर पर्यत लाईट एल.ए.डी. टयुबलर पोल लावणे रूपये ३० लाख सदरचा खर्च विकास भार निधी अंतर्गत भागविण्यात यावा.

मा.मुख्यलेखाअधिकारी श्री.मानकर :-पान नं.२३,अ.नं.क्र.१२ पथदिवे प्रकल्पावर टोकन रक्कम दर्शविली आहे.

मा.सभापती साहेब :- सोनेवाडी रोडचा सर्व्हे करून किती पोल टाकावे लागतील ते टाकण्यात यावे. श्री. बल्लाळ यांना आदेश दिले.

वाहतुक नियंत्रक देखभाल पान नं.२३,२४ वरील अ.नं.११ चे वाचन

मा.श्री.गणेश भोसले:-एकेक बस लावण्यात यावी.ठेका दिलातर त्याच्या बस बंद पडतात.जे व्यावसायिक या व्यवसायात येवु इच्छितात त्यांना बस देणेबाबत आवाहन केले तर त्यांची एक बस एकेक रुटवर लावु शकतो. ठेकेदाराला ठेका दया त्यांची कारणे ऐका किती दिवस हे चालणार १५लोकांच्या १५बस होतील आपला प्रश्न मिटेल.कोणत्या रूटला कोणती बस चालवायची हे आपण ठरवायचे .होतकरू माणसे यातून पुढे येतील. आजच्या मिटींगमध्ये ठराव करा.

मॅके.इंजि.श्री. निकम :- आपण एक ठराव केला तर आपण पुढे जावू शकतो. धोरणात्मक बाब ठरवू धोरण ठरवू.

मा.श्री.गणेश भोसले :- तिकीट दर आपण .ठरवू परत बोर्डात विषय घेवू.

मा.सभापती साहेब :- भोसले साहेब यांनी सुचविल्याप्रमाणे जनतेतून एक्स्प्रेशन ऑफ इंटरेष्टनुसार बस खेरदी साठी ही सभा मंजुरी देत आहे.

मा.सौ. दिपाली बारस्कर :- नगरमध्ये एक महिलांचा बचतगट आहे त्यांनी स्कुल बस खरेदी केली व ती स्कुल ला लावली.

पान नं.२५ कत्तलखाना

डॉ. पैठणकर :- आपल्याकडील वाहनासाठी ड्रायव्हर नाहीत ती आपण ठेक्याने घेतो

डॉ. पैठणकर :- खत प्रकल्प उभारणे तरतुदी कमी केल्यास हरकत नाही. रूपये १ लाखापर्यत टोकन तरतुद ठेवावी.

पान नं.२७ ६ नं. पान दवाखाने हॉस्पीटल अ.नं.८ व ९ वाचन केले.

मा.श्री. कुमार वाकळे :- अ.नं.१० अपंग पुर्नवसन योजना ३% तरतुद माहिती दया.

मा.श्री. योगीराज गाडे :- गंगा उदयान शेजारील रस्त्यावरील जागा मालकांना टिडीआरचा. रेट परवडत नाही त्यांना रोख रक्कम देण्यात यावी पावणेतीन कोटीचा रोड आहे.

नगररचनाकार श्री. जोशी :- गंगा उदयान जवळील श्री भिंगारे यांना टिडीआर चा प्रोसेस केली आहे. श्री.सोले यांचे प्रपोजल भूसंपादनासाठी महासभेकडे प्रसातवीत केले आहे.श्री सी.डी फकीर हे कोणत्याही प्रक्रियेला प्रतिसाद देत नाही.

मा.सभापती साहेब :- सी.डी. फकीर यांचेशी पत्रव्यवहार करा . त्यांना दोन्ही पध्दतीने पत्र दया.

पान नं.३० सा.बां.वि. रस्ते दुरूस्ती रू. १ कोटी तरतुद ठेवले आहे.

वैदयकीय आरोग्यधिकारी डॉ. राजुरकर :-.एमआरआय स्कॅन सुविधा सुरू करणे ऐवजी रक्तपेढी विघटन करणे हे लेखार्शिष करणेबाबत मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे समोर चर्चा झाली आहे

रू.३ कोटी डीपीडीसी तून मिळणार आहेत. रक्तपेढी विघटन करणे ऐवजी .एमआरआय स्कॅन सुविधा करणे् असे लेखाशिर्षक निर्माण करावे.

पान नं.२९ सार्व.उद्यान विभाग

मा.सौ.सोनाली चितळे :- यामधील अ.क्र.२ मधील "गुच्छ हार फुले खरेदी" या लेखाशिर्षा मध्ये केलेली तरतुद नगन्य दिसुन येत असून वर्षाभरामध्ये थोर महापुरूषांच्या जयंती व पुण्यतीथी व राष्ट्रीय कार्यक्रमांकरीता हार,फुलांची आवश्यकता असून "गुच्छ हार फुले खरेदी" या लेखाशिर्षामध्ये १ लाख रूपयांनी वाढ करून १लाख ५० हजार दर्शविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-"गुच्छ हार फुले खरेदी" या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये १ लाखांनी वाढ करण्यात येत आहे.

पान नं.३० विकास भार निधीतून शिल्लक

मा.श्री. कुमार वाकळे :- कै. बाळासाहेब दवाखाना कलरिंग करणे टॉयलेटची सुविधा अदयावत करा. सदरचा खर्च रू.२५ लाखाचे प्राप्त निधीतून करण्यात यावा

वैदयकीय आरोग्यधिकारी डॉ. राजुरकर :- प्राथमिक आरोग्य केंद्र वाढवायचे प्रमाणेच दिले होते.

मा.श्री. कुमार वाकळे :- बोल्हेगांव मध्ये हेल्थ पोष्ट आहे तिथे सुविधा देता येईल.

मा.श्री.गणेश भोसले :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात अगोदर डिलीव्हरचे ४५० होते आता ते १५० वर आले आहे.

वैदयकीय आरोग्यधिकारी डॉ.राजुरकर :-कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना १०० बेडचे हॉस्पीटल आहे साधारण ४५० डिलीव्हरी होत होत्या परंतु दैनंदिन सेवा पुरविण्यात अडचणी आहेत भुलतज्ञांचे मानधन वेळेवर अदा केले जात नाही त्यामुळे ते दवाखान्यात सेवा देण्यास तयार होत नाहीत..स्टाफ नर्सची संख्या २५पाहिजे ती आज १५आहे.दोन गायनाकॉलाजिस्ट आहेत.वारंवार होणारी आंदोलने यामुळे स्टाफ चे मनोधैर्यावर परिणाम होत आहे.दिवसेंदिवस यात वाढच होत आहे तरी कामामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न चालु आहे. १५०ते २०० प्रसुती होत आहेत.

मा.श्री. गणेश भोसले :-तुम्ही सुविधा देत नाही तुम्ही दुसरीकडे पेशंट पाठवता यामुळे ही संख्या कमी झाली महानगरपालिकेचे ब्रीद वाक्य काय आहे याचा विचार करा. सर्व पेशंट सिव्हील पाठवता असे घडु नये यामुळे संस्थेची बदनामी होते.

वैदयकीय आरोग्यधिकारी डॉ. राजुरकर :- इमारतीची दुरावस्था झालेली आहे त्यामुळे रुग्ण याठिकाणी दाखल होत नाही , फारयनान्सिअल सुविधा वेळेवर मिळत नाही यामुळेही अडचणी येतात

मा.श्री. गणेश भोसले:- याला जबाबदार कोण आहे हे सांगा तुम्ही त्याठिक्ाणी वागणुक चांगली दया तुमची सेवा पेशंट कसे वाढतील अशी दया यासाठी प्रयत्न करा आयुक्त साहेब यांनी आढावा घ्यावा व विचारणा करावी. आमचे प्रभागात एखादे चेंबर रिपेअर करायचे म्हटेल तर फक्त २ माणसे पाठवितात आम्हीच त्यांना सिमेंट,वाळु दयायची मग पालिका काय काम करते.मी १९९६ पासून नगरसेवक आहे त्या काळी फोन केला की सिमेंट ,वाळु, बिगारी हजर असायचे आता परिस्थीती बदली आहे इलेक्ट्रीक विभागाची हीच परिस्थीती आहे. या गोष्टीकडे कुठतरी लक्ष दया एखादया घरात जर १५ दिवस घाणपाणी येत असेल तर ते तसेच चालु राहते तो नागरीक बाहेरून जार आणुन पाणी पितो. किती दिवस हे सहन करणार. मेनमेन हायवे वरील स्ट्रीट लाईट बंद आहे. ते ५ ते १०% लाईट चालू आहे.

मा.श्री.योगीराज गाडेः-बल्लाळ साहेब फोन उचलतात पण त्यांच्या खालचे कर्मचारी फोन उचलत नाही

श्री. बल्लाळ :- विदयुत विभागासाठी ५ इले. इंजि. पदे मंजूर आहे. बांधकाम विभागासाठी २८ पदे मंजूर आहे. तिथे ३ इंजि. कार्यरत आहेत जानेवारी २०१६ पासून स्टॅपिंग पॅटर्न मंजूर आहे. ती पदे भरली पाहिजे , हा विषय गांभीर्याने घेत नाही ,मी सिव्हील इंजि. आहे. मला इलेक्टीक विभागाचा चार्जे दिला आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- लहारे साहेब भरती केव्हा करता येईल.

मा.श्री. गणेश भोसले :- इंजि. भरती करून मटेरियलय जर नसेल तर तुम्ही काय करणार.

मा.सभापती साहेब :- मा.आयुक्त साहेब सांगितले नुसार प्रभाग समिती निहाय औरंगाबद येथे मेंटेनन्ससाठी ठेकेदार नेमने आहेत झोनपाईज देता आहे तर बरे होईल.

आस्थापना प्रमुख श्री. लहारे :- आस्थापना खर्चाची ३५% पेक्षा जास्त असल्याने भरती करता येत नाही आता ८५% आस्थापना खर्च आहे.

मा.श्री. कुमार वाकळे :- राज्य सरकार यात आपल्याला मदत करू शकत नाही का ?

मा.सभापती साहेब :- वसंत टॉकीजजवळ १ एकर जागा आहे शॉपींग कॉम्पलेक्स उभारता येईल.

नगररचनाकार श्री. जोशी :- सदर जागेचे कोर्ट मॅटर चालू आहे.

मा.श्री. अविनाश घुले :- वायरमन आता किती आहेत.

श्री. बल्लाळ :- ११ कायम वायरमन , ९ मानधनावर आहे.

मा.श्री. अविनाश घुले :- नगरपालिका असतांना २० वायरमन होते आता महानगरपालिका झाली तरी वायरमनची संख्या वाढलेली नाही.सध्याची हद्दपहाता कमीत कमी ५० वायरमन सध्या आवश्यक आहे.

पान नं.३९ पाणी पुरवठा विभाग वाचन चालू.

मा.श्री.कुमार वाकळे :- सातवा वेतन आयोगाची तरतुद वाढीव करून ठेवा.

मा.सभापती साहेब :- किती टक्के करणे अपेक्षीत आहे.

मुख्य लेखा अधिकारी श्री. मानकर :- १५ टक्के तरतुद करण्यास हरकत नाही.

मा.श्री. गणेश भोसले :- पिंपळगावचे पाणी या शहराला येत होते. सन १९८० पर्यत पाणी चालू होते. त्याठिकाणी ७०० एकर जमीनीपासून उत्पन्न ७ रू. तरी भेटले का ? ही ७०० एकर जमीन विकली तर मिळणा-या रकमेतुन महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर शॉपिंग सेंटर उभारल्यास त्यापासून दरवर्षी ५ ते १० कोटी रूपये मिळतील व पालिकेला १० वर्षात १०० कोटी उत्पन्न मिळू शकते. आयुक्त, उपायुक्त यांनी विचार करून निर्णय घ्यावा.

मा.सभापती साहेब :- हा विषय धोरणात्मक असल्याने या बाबत आपण महासभेमध्ये घेवून चर्चा करावी लागेल.

मा.सौ. दिपाली बारस्कर :- प्रोफेसर चौक ते महाल रोड , कसबे वस्ती पर्यत रस्ता मॉडेल रोड विकासीत करणे या रस्त्यासाठी मा. महाराष्ट्र शासनाने शिल्लक रकमेच्या व्याजातून रू. ३.५० कोटी तरतुद केली आहे. हा रस्ता रूपये ३.५० कोटीतून पुर्ण होणार नसल्याने शहरातील "मॉडेल रस्ता " या लेखाशिर्षातंर्गत रूपये ३ कोटीची तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-प्रोफेसर चौक ते महाल रोड,कसबे वस्ती पर्यतचा रस्ता सावेडी भागातील मॉडेल रस्ता विकासीत करणे "मॉडेल रस्ता"या लेखाशिर्षातंर्गत रू.५० लाखाची तरतुद करण्यात यावी.

मा.सौ.संध्या पवार :-शिवनगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेकरिता रूपये ५०लाख, ज्ञानेश्वर नगर साईदिपनगर व शिरसाठ मळा अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे करिता रूपये ५०लाख,

श्रीकृष्णनगर अंतर्गत डांबरीकरण करणेकरिता रूपये ५० लाख , निर्मलनगर उदयान विकासीत करणे करिता रूपये ५० लाख तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- पवार मॅडम यांनी सांगितलेली शिवनगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेकरिता रूपये २० लाख , ज्ञानेश्वर नगर साईदिपनगर व शिरसाठ मळा अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेकरिता रूपये २० लाख , श्रीकृष्णनगर अंतर्गत डांबरीकरण करणेकरिता रूपये २० लाख या तीन रस्त्याचा खर्च रस्ते डांबरीकरण , नुतणीकरण करणे या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा. तसेच निर्मलनगर उदयान विकासीत करणे करिता रूपये २० लाख तरतुद उदयान विकसीत करणे. या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.

मा.श्री.गणेश भोसले :- अहमदनगर शहर हद्दीमध्ये लोकवस्ती वाढत असून नळधारकांची संख्येमध्ये वाढ होत असल्याने नळधारकांकडून जमा पाणीपट्टी या लेखाशिर्षामध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- नळधारकांकडून जमा पाणीपट्टी या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १ कोटी ६२ लक्ष ५० हजाराने वाढ करण्यात यावी.

मा.श्री. मनोज कोतकर :- अनाधिकृत नळ नियमानुकूल करणे. लेखाशिर्षांतर्गत वाढ करण्यात यावी. पाणी विक्री जमा या लेखाशिर्षामध्ये वाढ सुचविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मिळालेल्या माहिती नुसार अहमदनगर शहर हद्दीमध्ये १ लाख १५ हजार मिळकत धारकांच्या नोंदी असून फक्त ५३ हजार अधिकृत नळ कनेक्शन आहेत.अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम वाढवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. अनाधिकृत नळ नियमानुकूल करणे. लेखाशिर्षांतर्गत रूपये २ कोटीची वाढ करण्यात यावी. तसेच पाणी विक्री जमा या लेखाशिर्षामध्ये रूपये १ कोटीचा वाढ सुचविण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- " विकास भार निधीतुन खर्च " या लेखाशिर्षाअंतर्गत रूपये १ कोटी २५ लाख दर्शविण्यात आली असून या लेखाशिर्षा मध्ये रू. १ कोटी ७५ लाख वाढ करण्यात यावी. व "रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा(बांधकाम परवाना)" या लेखाशिर्षामध्ये ५० लाख रूपयांनी वाढ करावी. तसेच " "रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक ) " या लेखाशिर्षामध्ये रूपये ५०लाखांनी वाढ सुचविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- " विकास भार निधीतुन खर्च " या लेखाशिर्षाअंतर्गत रूपये १ कोटी २५ लाख दर्शविण्यात आली असून या लेखाशिर्षा मध्ये रू. १ कोटी ७५ लाख वाढ करण्यात यावी. . व " बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा " या लेखाशिर्षा मध्ये ३६लाख रूपयांनी वाढ करून रूपये ५०लाख दर्शविण्यात यावी.तसेच "रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक)" या लेखाशिर्षामध्ये रूपये ५०लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब :- मा.नगरसेवकांना आपल्या प्रभागामध्ये तातडीचे कामे करावी लागतात याकरिता पान नं. ४६ वर अ.नं. १४ मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी करता रू.५ कोटी ५६ लाखाची तरतुद करण्यात आली आहे. एकुण नगरसेवकांची संख्या विचारात घेता प्रत्येक नगरसेवकांस रू. ७ लाख ६१ हजार निधी मिळणार आहे. हा निधी तोडका असल्याने वॉर्ड विकास निधी या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ३ कोटी ९३ लाखाची तरतुद करण्यात यावी त्यामुळे प्रभागात कमीत कमी रू.१३ लाखाची कामे करता येतील.

मा.श्री.गणेश भोसले :- काही दिवसापूर्वी महानगरपालिका कर्मचा-यांनी मा.महापौर साहेब यांना मनपा कर्मचा-याकरिता घरे बांधणेबाबतचे निवेदन दिले होते. मनपा कर्मचा-याच्या निवासाकरिता टोकन रक्कम रूपये ५ लाखाची तरतुद करण्यात यावी. घर बांधणी योजना फक्त कागदवरच

रहाते यास्तव मा.नगररचनाकार  विभागाने शहर लगतच्या जागेची पाहणी करून तात्काळ ही योजना चालू करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-मनपा कर्मचा-याच्या निवासाकरिता टोकन रक्कम रूपये ५लाखाची तरतुद करण्यात यावी. घरबांधणी योजना फक्त कागदवरच रहाते यास्तव मा.नगररचनाकार  विभागाने तात्काळ शहर लगतच्या जागेची पाहणी करून तात्काळ ही योजना चालू करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी(२%),मा.महापौर शहर विकास निधी, उपमहापौर शहर विकास निधी,स्थायी समिती सभापती शहर विकास निधी, सभापती महिला व बाल विकास निधी, उपसभापती महिला व बाल कल्याण निधी तरतुद शून्य आहे.

मा.श्री. कुमार वाकळे :- मा.महापौर शहर विकास निधी रू.३ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी रू.५०लाख, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.५० लाख, सभापती महिला व बाल विकास निधी रू.१५ लाख, उपसभापती महिला व बाल कल्याणस निधी रू. १० लाख, मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी रू.२५ लाख तसेच नविन लेखाशिर्षा मा.सभागृह नेता शहर विकास निधी रू.२५ लाखाची तरतुद दर्शविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मा.महापौर शहर विकास निधी रू.३ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी रू.५०लाख, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.५० लाख, सभापती महिला व बाल विकास निधी रू.१५ लाख, उपसभापती महिला व बाल कल्याणस निधी रू. १० लाख, मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी रू.२५ लाख तसेच मा.सभागृह नेते शहर विकास निधी रू.२५ लाखाची तरतुद दर्शविण्यात यावी.

मा.श्री.कुमार वाकळे :- अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये १ कोटीने वाढ करण्यात यावी व या तरतुदीतील रकमेतुन प्रभाग
क्रमांक १० मधिल शनिगल्ली ,इदगाह मैदान अंतर्गत भागामध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व बंद पाईप गटर करणे या कामाकरीता रू.२५ लक्ष तसेच प्रभाग क्र.७ बोल्हेगांव गांवठाण म्हैसमाळे घर ते धनंजय विविध वस्तु भांडार ते भिंगारदिवे मळा रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे करीता रू.३० लाख अशा दोन रस्त्यांच्या कामांचा खर्च अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- "अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे " या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये १ कोटीने वाढ करण्यात यावी व या तरतुदीतील रकमेतुन प्रभाग क्रमांक १० मधिल शनिगल्ली ,इदगाह मैदान अंतर्गत भागामध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व बंद पाईप गटर करणे या कामाकरीता रू.२५ लक्ष तसेच प्रभाग क्र.७ बोल्हेगांव गांवठाण म्हैसमाळे घर ते धनंजय विविध वस्तु भांडार ते भिंगारदिवे मळा रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे करीता रू.३० लाख अशा दोन रस्त्यांच्या कामांचा खर्च अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून करण्यात यावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- प्रभाग क्रमांक १० मधील खानका शरीफ मध्ये नसिम घर ते सय्यद बेकरी ते डॉ.जाकिर ते हाजी शेरआली घरापर्यतचा रस्ता डांबरीकरण व बंदपाईप गटर (३००mm) करणे करीता अंदाजीत रक्कम रूपये १५ लाख "अनाधिकृत बांधकाम नियमाकूल करणे " या लेखाशिर्षा अंतर्गत जमा होणा-या रकमेतुन भागविण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १० मधील खानका शरीफ मध्ये नसिम घर ते सय्यद बेकरी ते डॉ.जाकिर ते हाजी शेरआली घरापर्यतचा रस्ता डांबरीकरण व बंदपाईप गटर (३००mm) करणे

करीता अंदाजीत रक्कम रूपये १५ लाख "अनाधिकृत बांधकाम नियमाकूल करणे " या लेखाशिर्षा अंतर्गत जमा होणा-या रकमेतुन करण्यात यावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- तरूणांमध्ये व्यायामाची आवड निर्माण करण्याकरीता, याभागातील तरुणांच्या मागणीनुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आर.टी.ओ.टाकी जवळील मोकळया जागेत अदयावत जिम बांधणे करीता रक्कम रूपये २० लाखांची तरतुद करण्यात यावी. तसेच "क्रीडा व संस्कृतीक विभाग " पान क्र.३१ मधील अ.क्र.३ मधिल " क्रीडा साहित्य खरेदी " या लेखाशिर्षा मध्ये तरतुद केलेली दिसुन येत नाही.सदरच्या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये २५ लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात येवून, नव्याने निर्माण होणा-या जीम करीता अंदाजे रक्कम रूपये १५ लाखांचे साहित्य खरेदी करून बसविण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या आर.टी.ओ.टाकी जवळील मोकळया जागेत अदयावत जिम बांधणे करीता रक्कम रूपये २० लाखाचा खर्च "नवीन इमारत" या लेखाशिर्षामधुन भागविण्यात यावा. तसेच "क्रीडा व संस्कृतीक विभाग " पान क्र.३१ मधील अ.क्र.३ मधिल "क्रीडा साहित्य खरेदी " या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये २५ लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात येवून, नव्याने निर्माण होणा-या जीम करीता अंदाजे रक्कम रूपये १५ लाखांचे साहित्य खरेदी करून बसविण्यात यावे.

सौ.सोनाली चितळे :- अमरधाम येथील सध्या दहन विधी झाल्यानंतर हस्ती व रक्षा ठेवण्याकरीता सध्या अस्तित्वात असलेल्या खोलीची व अंत्यविधीनंतर नागरीकांना सध्या अस्तीत्वात असलेली टाकी लिकेज झाली असून तोटया खराब झाल्या आहेत.

त्यामुळे हस्ती सुरक्षीत ठेवण्याकरीता नव्याने बांधकाम करून त्यामध्ये लॉकरसह कपाट बसविणे व मोठी पाण्याची टाकी बांधणे या करीता रूपये १५ लक्ष रूपयांची तरतुद करावी हि विनंती.या बाबतचे पत्र मी सभापती साहेब यांना देत आहे.

मा.सभापती साहेब :- मा.सौ.सोनालीताई चितळे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार अमरधाम येथील हस्ती सुरक्षीत ठेवण्याकरीता लॉकर रूम व इतर पाण्याच्या टाकी करीता रक्कम रूपये १५ लक्ष रूपयांची तरतुद स्मशान भुमी विकासीत या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावी.

मा.श्री. कुमार वाकळे :- तपोवन भागातील नागरीकांना शहराकडे जाण्याकरीता असणारा रस्त्याची खुप दुरावस्था झाल्याने प्र.क्र.१ गणेश डेअरी ,गावडे मळा ते राजनंदिनी हॉटेल ते तपोवन रोड पर्यतचा रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे करीता बजेट मध्ये रक्कम रूपये १५ लक्ष रूपयांची तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- प्र.क्र.१ गणेश डेअरी ,गावडे मळा ते राजनंदिनी हॉटेल ते तपोवन रोड पर्यतचा रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे करीता बजेट मध्ये रक्कम रूपये १५ लक्ष रूपयांची तरतुद करण्यात येत आहे. सदरचा खर्च रस्ते डांबरीकरण , नुतणीकरण करणे या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा. तसेच मा.श्री.आसीफ सुलतान,नगरसेवक यांनी स्थायी समिती कडे दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये बहुतेक प्रभागांमध्ये अल्पसंख्यांक बहुल वस्त्या असून तेथील भागांच्या नागरी समस्या मोठया प्रमाणावर आहे.या करीता "अल्पसंख्यांक बहुल वस्ती सुधारणा " हे नविन लेखाशिर्षा निर्माण करून त्या अंतर्गत रक्कम रूपये ३० लाखांची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.मनोज कोतकर :- मा.शासनाकडुन विविध योजने अंतर्गत सन २०१९-२०२० करिता मुलभूत /प्राथमिक सुविधा विकास निधी,रस्ता अनुदान,दलितवस्ती सुधार योजना,महाराष्ट्र सुवर्ण

नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) ,नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना,अल्पसंख्यांक बहुलक्षेत्र विकास निधी नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत विकास कामे,आदी मा.शासनाच्या निधीतील कामे सुचविण्यासाठी मा.महापौर यांना अधिकार देण्यात यावेत.जेणे करून सर्व प्रभागांमध्ये मा.सदस्यांच्या सुचनेनुसार सखोल चर्चा होवून प्रभागांतील कामे योग्य पध्दतीने व तात्काळ मार्गी लागण्यास मदत होईल.

मा.सभापती साहेब :- मा.शासनाकडुन विविध योजने अंतर्गत सन २०१९-२०२० करिता मुलभूत /प्राथमिक सुविधा विकास निधी,रस्ता अनुदान,दलितवस्ती सुधार योजना,महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) ,नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना,अल्पसंख्यांक बहुलक्षेत्र विकास निधी नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत विकास कामे,आदी मा.शासनाच्या निधीतील कामे सुचविण्यासाठी मा.महापौर यांना सर्वानुमते अधिकार देण्यात येत आहेत.

मा.श्री.कुमार वाकळे :- अंदाजपत्रकीय स्थायी समिती सभेत झालेली चर्चा तसेच दुरूस्ती व फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

मा.श्री.अविनाश घुले :- अंदाजपत्रकीय स्थायी समिती सभेत झालेली चर्चा तसेच फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१९-२० या अंदाजपत्रकीय मिटींग साठी मा.आयुक्त ,मा.अति.आयुक्त, मा.उपायुक्त (सा./ कर),सर्व विभाग प्रमुख,यांनी मेहनत घेतली आहे.मा.सदस्यांनी तरतुदी आपण सुचविल्या बद्दल मा.स्थायी समितीच्या वतीने आभार मानते.आपणा सर्वाचे आभार मानतो ,अर्थसंकल्पीय सभा संपल्याचे जाहीर करते.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे. मा. महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे (**सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये** ) दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**तसेच**

* अंदाजपत्रकाच्या पुस्तकावरील हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे भवन हे नाव पुसट झाले आहे ते पुढील छपाई करताना ठळक करण्यात यावे.

* सर्वसाधारण कर वसुलीमध्ये वस्तुनिष्ठपणाच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढणार असल्याने सर्वसाधारण करामध्ये २० टक्के वाढ सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.

* बिगरशेती करतांना महानगरपालिका हद्दी मध्ये बिगरशेती जामीनीवर टॅक्स लावणे अपेक्षित आहे.मालमत्ता सध्या शेती असून बिगरशेतीचे प्रस्ताव सादर करतांना त्यांचेकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही असे निदर्शनास येत आहे.या करीता लेखाशिर्ष मध्ये रू.१ कोटी ४० लाख तरतुद करण्यात यावी.

* शहरातील इमारतींच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे.त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाकडील "ना हरकत प्रमाणपत्र " या लेखाशिर्षा मध्ये रू.५ लाखांनी वाढ करण्यात यावी.

* नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिंग होम ॲक्ट फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.या लेखाशिर्षा मध्ये रू.५ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

* पर्यवेक्षण (आरोग्य)आकस्मीत खर्चामध्ये रूपये २ लाखांनी वाढ करण्यात यावी.

* नेहरू मार्केट व प्रोफेसर कॉलनी चौक तसेच बेग पटांगण ,वसंत टॉकिज समोरील जागेत महानगरपालिका अथवा बी.ओ.टी. तत्वावर गाळ्यांचे बांधकाम करून भाडेतत्वावर देण्यात यावेत.

* गाळे हस्तांतरणाची प्रक्रिया त्वरीत राबवून गाळे हस्तांतरण फी या लेखाशिर्षामध्ये रू.५० लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.

* अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे या लेखाशिर्षा मध्ये रू.३ कोटी ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

*. मालमत्ता नांव नोंदणी फि या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे

* "गुंठेवारी विकास नियमिती करणे " यालेखाशिर्षामध्ये रूपये ४ लाख वाढ करण्यात यावी.

*जाहिरात बोर्ड जागा भाडे या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रूपये ६लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* भाडेतत्वावर दिलेल्या शाळाखोल्यामधील थकबाकीदारांवर कडक करावाई करण्यात येवून मनपा शाळा भाडेपासून उत्पन्न या लेखाशिर्षातंर्गत रू.२० लाखाची वाढ करण्यात यावी.

* पे ॲण्ड पार्क या लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात उत्पन्न मिळणार असल्याने या लेखाशिर्षा मध्ये १० लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात यावी.

*मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क या लेखाशिर्षामध्ये रू.२५ लाख रूपयांची वाढ सुचविण्यात येत आहे.

*मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.

* गॅन्ट्रीज रॉयल्टी या लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

*रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर या लेखाशिर्षा मध्ये रूपये १ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.

*डॉक्टरांकडून जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता आकारण्यात येणा-या दरामध्ये वाढ झालेली असल्याने जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट या लेखाशिर्षा मध्ये रू.१० लाखांनी वाढ करण्यात यावी.

*खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक निविदा झाली असल्याने घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासून उत्पन्नामध्ये रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

*मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* सामान्य प्रशासन विभाग क्र.८ मधील लेखाशिर्षामध्ये "महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ खर्च" बदल करून "महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ चहापान खर्च" असे लेखाशिर्ष दर्शविण्यांत यावे. व या लेखाशिर्षातंर्गत रूपये ५० हजाराने वाढ करण्यात यावी.

* नगरसचिव विभाग,आकस्मिक खर्च /झेरॉक्स खर्च असे लेखाशिर्ष दर्शविण्यात यावे.तसेच मा.महासभा,मा.स्थायी समिती ,इतर प्रभाग समिती,अतीथी चहापान खर्च या लेखाशिर्षामध्ये बदल करून मा.महासभा,मा.स्थायी समिती ,इतर प्रभाग समिती, अतीथी चहापान,अल्पोपहार खर्च दर्शविण्यात येवून या लेखाशिर्षाअंतर्गत रक्क्म रूपये ४ लाखांची वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर शहराचा वर्धापन दिन साजरा करणे,शहरातील रस्तयांवर सचित्र दिशादर्शक फलक बसविणे ,नगर दर्शन उपक्रम राबविणे या कामांकरीता "नगर शहर पर्यटन विकास "नवीन लेखशिर्ष निर्माण करण्यात येउन त्यामध्ये रूपये ५ लाख रकमेची तरतूद करण्यात यावी.

* अमृत योजने अंतर्गत शहरातील विविध भागातील उदयाने विकसीत करणे करीता आरक्षीत ठिकाणी संरक्षण भिंत किंवा तारकंपौंड करणे अवश्यक असल्याने रक्कम रूपये ३० लाख तसेच सावेडी भागातील निर्मलनगर उदयान विकासीत करणे करिता रूपये १० लाख अशी एकुण रूपये ४० लाखांनी "उद्यान विकास व तारकंपौड " या लेखाशिर्षा अंतर्गत वाढ करण्यात यावी.

* गंगाउद्यान देखभाल-दुरूस्ती करीता देण्यात आलेल्या ठेकेदार संस्थेची मुदत संपल्याने तात्काळ निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.तो पर्यत एखादया सामाजिक संस्थेला देखभाल-दुरूस्ती करीता देण्यात यावी.

* नविन प्रशासकिय ईमारत या लेखाशिर्षा अंतर्गत रू.३ लाखांनी वाढ करण्यात यावी.

* " विकास भार निधीतुन खर्च " या लेखाशिर्षाअंतर्गत रूपये १ कोटी २५ लाख दर्शविण्यात आली असून या लेखाशिर्षा मध्ये रू. १ कोटी ७५ लाख वाढ करण्यात यावी.

* " बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा " या लेखाशिर्षा मध्ये ५०लाख रूपयांनी वाढ करावी.

* "रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक ) " या लेखाशिर्षामध्ये रूपये ५०लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

*विद्युत साहित्य खरेदी या लेखाशिर्षामध्ये रूपये १०लाखाची वाढ करण्यात यावी.

*अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम वाढवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. अनाधिकृत नळ निमानुकुल करणे या लेखाशिर्षाअंतर्गत रू.२ कोटीची वाढ करण्यात यावी.

*पाणी विक्री जमा या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटी वाढ करण्यात यावी.

* सावेडी गांवठाण सिटी सर्व्हे साठी तरतुद रू.२० लाखांनी कमी दर्शविण्यात यावी.

* स्त्री जन्माचे स्वागत या लेखाशिर्षा अंतर्गत रू.२ लाख वाढ करण्यात यावी.

*हिवताप प्रतिबंधक योजना कंत्राटी पध्दतीने फवारणी करणे रू.१० लाख वाढ करण्यात यावी.

*गुच्छ व हार खरेदी रू.१ लाख तरतुद वाढविण्यात यावी.

*वॉर्ड विकास निधी या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ३ कोटी ९३ लाखाची तरतुद करण्यात यावी त्यामुळे प्रभागात कमीत कमी रू.१३ लाखाची कामे करता येतील.

*मनपा कर्मचारी घरकुल योजना या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये १० लाखाची तरतुद करण्यात यावी.

*मा.महापौर शहर विकास निधी रू.३ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी रू.५०लाख, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.५० लाख, सभापती महिला व बाल विकास निधी रू.१५ लाख, उपसभापती महिला व बाल कल्याणस निधी रू. १० लाख, मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी रू.२५ लाख तसेच मा.सभागृह नेते शहर विकास निधी रू.२५ लाखाची तरतुद दर्शविण्यात यावी.

*मा.महापौर शहर विकास निधी, मा.उपमहापौर शहर विकास निधी, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी , सभापती महिला व बाल विकास निधी , उपसभापती महिला व बाल कल्याणस निधी , मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी ,मा.सभागृह नेते शहर विकास निधी या लेखाशिर्षा अंतर्गत झालेल्या कामाचे देयके अर्थ विभागाकडे प्राप्त झाल्या नंतर ती प्राधान्याने अदा करण्यात यावी.

* "सेल्फी पॉईट करणे " या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १५ लक्ष रूपयांची तरतुद करण्यात यावी.

* सावेडी भागातील प्रोफेसर चौक ते भिस्तबागमहाल रोड , कसबे वस्ती पर्यतचा रस्ता मॉडेल रस्ता विकासीत करणेकरिता "मॉडेल रस्ता" या लेखाशिर्षातंर्गत रू.५०लाखाची तरतुद करण्यात यावी.

* मोबाईल टॉवर उत्पन्नातुन विकास कामे करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५०लाखांची वाढ करावी.

*नळ धारकांकडून जमा पाणीपट्टी रक्कम रूपये १ कोटी ६२ लाख ५०हजार ने वाढ करण्यात यावी.

* अग्नीशमन सुरक्षासाहित्य खरेदीमध्ये रूपये ३लाख ४४ हजार रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* प्रभाग क्रमांक १० मधिल शनिगल्ली ,इदगाह मैदान अंतर्गत भागामध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व बंद पाईप गटर करणे या कामाकरीता रू.२५ लाखचा खर्च "अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे " या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

* बोल्हेगाव-सावेडी भागातील प्रभाग क्र.७ बोल्हेगांव गांवठाण म्हैसमाळे घर ते धनंजय विविध वस्तु भांडार ते भिंगारदिवे मळा रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे करीता रू.३० लाखचा खर्च "अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे " या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यंत यावा.

*प्रभाग क्रमांक १० मधील खानका शरीफ मध्ये नसिम घर ते सय्यद बेकरी ते डॉ.जाकिर ते हाजी शेरआली घरापर्यतचा रस्ता डांबरीकरण व बंदपाईप गटर (३००mm) करणे करीता अंदाजीत रक्कम रूपये १५ लाख "अनाधिकृत बांधकाम नियमाकूल करणे " या लेखाशिर्षा अंतर्गत जमा होणा-या रकमेतुन भागविण्यात यावा.

*प्रभाग क्रमांक ७ मधील बोल्हेगांव ते सावेडी खंडोबा मंदिर पर्यत लाईट एल.ए.डी. टयुबलर पोल लावणे रूपये ३० लाख सदरचा खर्च "विकास भार निधी" अंतर्गत भागविण्यात यावा.

*अहमदनगर महानगरपालिकेच्या आर.टी.ओ.टाकी जवळील मोकळया जागेत अदयावत जिम बांधणे करीता रक्कम रूपये २० लाखाचा खर्च "नवीन इमारत" या लेखाशिर्षामधुन भागविण्यात यावा.

* "क्रीडा व संस्कृतीक विभाग " पान क्र.३१ मधील अ.क्र.३ मधिल "क्रीडा साहित्य खरेदी " या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये १५ लाख रूपयांची वाढ करून , नव्याने निर्माण होणा-या जीम करीता अंदाजे रक्कम रूपये १५ लाखांचे साहित्य खरेदी करून बसविण्यात यावे.

* सावेडी भागातील शिवनगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे, सावेडी भागातील श्रीकृष्णनगर अंतर्गत डांबरीकरण करणे, सावेडी भागातील ज्ञानेश्वर नगर साईदिपनगर व शिरसाठ मळा अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे, प्र.क्र.१ गणेश डेअरी ,गावडे मळा ते राजनंदिनी हॉटेल ते तपोवन रोड पर्यतचा रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे अनुक्रमे रक्कम रूपये २० लाखांची तरतुद करण्यात यावी.सदरकामाचा खर्च रस्ते डांबरीकरण व नुतनीकरण या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रूपये ६०लाख ने वाढ करण्यात यावी.

*अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये बहुतेक प्रभागांमध्ये अल्पसंख्यांक बहुल वस्त्या असून तेथील भागांच्या नागरी समस्या मोठया प्रमाणावर आहे.या करीता "अल्पसंख्यांक बहुल वस्ती सुधारणा " हे नविन लेखाशिर्षा निर्माण करून त्या अंतर्गत रक्कम रूपये ५० लाखांची तरतुद करण्यात यावी.

*अमरधाम येथील हस्ती सुरक्षीत ठेवण्याकरीता लॉकर रूम व पाण्याची टाकी करीता "स्मशान भुमी विकसीत करणे "या लेखाशिर्षातंर्गत रू १५ लाखाने वाढ करण्यात यावी.

*"उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव"या लेखाशिर्षामध्ये रूपये १ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* "उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव" या लेखाशिर्षा अंतर्गत राष्ट्रपती मा.प्रणव मुखर्जी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. दिव्यांग चि.अक्षय सुनिल वैद्य याचा महानगरपालिकेमार्फत सत्कार करून त्यास उत्तेजनार्थ रक्कम रूपये ५० हजार देवून गौरव करण्यात यावा.

*सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षामध्ये रूपये ६ लाख तरतूद करण्यात यावी. रसिक ग्रुप,अ.नगर व नगर जल्लेष (ट्रस्ट) अ,नगर या सामाजिक संस्थांना मागणी पत्रानुसार अनुक्रमे रूपये १लाख ५० हजार देणगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत संबंधीत संस्थाकडून कागदपत्राची पुर्तता करून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदरचा खर्च सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.

*महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांना ७वा वेतन आयोग लागू करण्याकरीता आस्थापनावरील वेतनाच्या प्रत्येक विभागाच्या लेखाशिर्षाअंतर्गत ७ टक्के प्रमाणे वाढ करण्यात यावी. याकरीता येणा-या रकमेची तरतुद करण्यात यावी.

*मा.शासनाकडुन विविध योजने अंतर्गत सन २०१९-२०२० करिता मुलभूत /प्राथमिक सुविधा विकास निधी,रस्ता अनुदान,दलितवस्ती सुधार योजना,महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) ,नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना,अल्पसंख्यांक बहुलक्षेत्र विकास निधी नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत विकास कामे,आदी मा.शासनाच्या निधीतील कामे सुचविण्यासाठी मा.महापौर यांना सर्वानुमते अधिकार देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१८-२०१९ चे सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सन २०१९-२०२०अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० सालचे बाबवार अंदाजपत्रकास मान्यता व शिफारशी सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
मा.श्री. शेख मुदस्सर जहाँगीर,
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत** :- सन २०१९-२०२० सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर** | | | | | |
| **मा.स्थायी समितीने मंजूर केलेला सन२०१८-२०१९चा सुधारीत अर्थसंकल्प (आकडे लाखात)** | | | | | |
| **सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१८)........................................... ८६३.५५** | | | | | |
| **एकुण जमा..................................................................... ५१४६५.२०** | | | | | |
| **सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा................................................ ५२३२८.७५** | | | | | |
| **एकुण खर्च.................................................................... ५१९८५.०२** | | | | | |
| **अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१९).........................................३४३.७३** | | | | | |
| **अ. नं.** | **लेखाशिर्ष (जमा बाजू ) सन २०१८-१९** | **मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद** | **मा.स्थायी समितीने केलेला बदल** | | **मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद** |
| | | | **वाढ** | **घट** | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | पर्यटनासाठी पायाभूत सोयीसुविधा पुरविणे अनुदान | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| २ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अनुदान | ३००.०० | ७०.०० | | ३७०.०० |
| ३ | शासकीय विमा | १२.०० | १४.०० | | २६.०० |
| | **एकुण** | **३१२.००** | **९४.००** | **०.००** | **४०६.००** |
| | | | | | |
| **अ. नं.** | **लेखाशिर्ष (खर्च बाजू ) सन २०१८-१९** | **मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद** | **मा.स्थायी समितीने केलेला बदल** | | **मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद** |
| | | | **वाढ** | **घट** | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| **१** | पेन्शन फंडाकडे वर्ग | २९००.०० | १२०.०० | | ३०२०.०० |
| **२** | पाचवे/सहावे वेतन आयोग फरक ( पेन्शनर ) | २२७.०० | | १३५.०० | ९२.०० |
| **३** | आकसिक खर्च (साप्रवि) | १.६९ | ०.१० | | १.७९ |
| **४** | आकस्मिक खर्च (नगररचना) | ०.०० | २.५० | | २.५० |
| ५ | बेवारस प्रेतांची विल्हेवाट करणे | ३.८४ | ०.४० | | ४.२४ |
| ६ | कर्मचारी मानधन (माध्यमिक शिक्षण) | ५.७१ | १.०० | | ६.७१ |
| ७ | पर्यटनासाठी पायाभूत सोयीसुविधा पुरविणे अनुदान | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| ८ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अनुदान | ३००.०० | ७०.०० | | ३७०.०० |
| ९ | तांत्रिक लेखापरीक्षण फी | ०.०० | ११.०० | | ११.०० |
| १० | शासकीय विमा | १२.०० | १४.०० | | २६.०० |
| | **एकुण** | **३४५०.२४** | **२२९.००** | **१३५.००** | **३५४४.२४** |

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

| अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा. स्थायी समितीने मंजूर केलेला सन २०१९-२०२० चा अर्थसंकल्प (आकडे लाखात) | | | | | |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१९)........................................३४३.७३ | | | | | |
| एकुण जमा............................................................... ७७७११.५० | | | | | |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................. ७८०५५.२३ | | | | | |
| एकुण खर्च............................................................... ७७७४०.११ | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२०).......................................३१५.१२ | | | | | |
| अ. नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू ) सन २०१९-२० | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समिती ने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | संकलीत कर | ३१००.०० | ६२०.०० | | ३७२०.०० |
| २ | बिगरशेती जमिनीवर कर | ०.०० | १४०.०० | | १४०.०० |
| ३ | ना हरकत प्रमाणपत्र (अगिशमन) | १.०० | ५.०० | | ६.०० |
| ४ | मुंबई नर्सिंग होम ॲाक्ट फी | ०.५० | ५.०० | | ५.५० |
| ५ | गाळे हस्तांतरण फी | १००.०० | ५०.०० | | १५०.०० |
| ६ | अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | १००.०० | ३५०.०० | | ४५०.०० |
| ७ | मालमत्ता नाव नोंदणी फी | ३५०.०० | ५०.०० | | ४००.०० |
| ८ | गुंठेवारी विकास नियमित करणे | ४.०० | ४.०० | | ८.०० |
| ९ | जाहिरात बोर्ड जागे भाडे | ८.०० | ६.०० | | १४.०० |
| १० | मनपा शाळा भाडेपासून उत्पन्न | ५०.०० | २०.०० | | ७०.०० |
| ११ | पे ॲण्ड पार्कपासुन उत्पन्न | १२.४५ | १०.०० | | २२.४५ |
| १२ | मोबाईल टॉवर प्रशासकीय शुल्क | ७५.०० | २५.०० | | १००.०० |
| १३ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईपासुन उत्पन्न | २४.५० | ५०.०० | | ७४.५० |
| १४ | गॅट्रीज रॉयल्टी | १.५० | २०.०० | | २१.५० |
| १५ | रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर | २५०.०० | १००.०० | | ३५०.०० |
| १६ | जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट | ३०.०० | १०.०० | | ४०.०० |
| १७ | घनकचरा संकलन व वाहतूक अंतर्गत मनपा भाडेपासुन उत्पन्न | ५०.०० | ५०.०० | | १००.०० |
| १८ | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | २५०.०० | १००.०० | | ३५०.०० |
| १९ | विकास भार | ५००.०० | १७५.०० | | ६७५.०० |
| २० | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | १४.०० | ५०.०० | | ६४.०० |
| २१ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आऊटधारक) | १५०.०० | ५०.०० | | २००.०० |
| २२ | अनाधिकृत नळ नियमानुकूल करणे | १२५.०० | २००.०० | | ३२५.०० |
| २३ | पाणी विक्री जमा | १७५.०० | १००.०० | | २७५.०० |
| २४ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | १५००.०० | १६२.५० | | १६६२.५० |
| | **एकुण** | **६८७०.९५** | **२३५२.५०** | **०.००** | **९२२३.४५** |

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

| अ. नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू ) सन २०१९-२० | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समिती ने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | महाराष्ट्र दिन,स्वातंत्र्य दिन व सत्कार समारंभ चहापान खर्च | १.०० | ०.५० | | १.५० |
| २ | आकस्मिक खर्च (नगरसचिव विभाग) | ३.०० | ४.०० | | ७.०० |
| ३ | आकस्मिक खर्च (आरोग्य (पर्यवेक्षण) विभाग) | ५.०० | २.०० | | ७.०० |
| ४ | अंतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | २००.०० | १००.०० | | ३००.०० |
| ५ | नगर शहर पर्यटन विकास | ०.०० | ५.०० | | ५.०० |
| ६ | उद्यान विकास व तार कंपौंड | १०.०० | ४०.०० | | ५०.०० |
| ७ | विकास भार | १२५.०० | ४३.७५ | | १६८.७५ |
| ८ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | १४.०० | ५०.०० | | ६४.०० |
| ९ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आऊटधारक) | १५०.०० | ५०.०० | | २००.०० |
| १० | विद्युत साहित्य खरेदी | ७५.०० | १०.०० | | ८५.०० |
| ११ | सावेडी गावठाण सिटी सर्व्हे | ६०.०० | | २०.०० | ४०.०० |
| १२ | स्त्री जमाचे स्वागत करणे | ०.०० | २.०० | | २.०० |
| १३ | हिवताप प्रतिबंधक योजना कंत्राटी पध्दतीने फवारणी करणे | २०.०० | १०.०० | | ३०.०० |
| १४ | गुच्छ व हार खरेदी | ०.५० | १.०० | | १.५० |
| १५ | वॉर्ड विकास निधी | ०.०० | ३९३.०० | | ३९३.०० |
| १६ | मनपा कर्मचारी घरकुल योजना | ०.०१ | १०.०० | | १०.०१ |
| १७ | मा. महापौर शहर विकास निधी | ०.०० | ३००.०० | | ३००.०० |
| १८ | मा.उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १९ | मा. सभापती स्थायी समिती शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| २० | मा. सभापती महिला व बालकल्याण विकास निधी | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| २१ | मा.उपसभापती महिला व बालकल्याण विकास निधी | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| २२ | मा. विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| २३ | मा. सभागृह नेता शहर विकास निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| २४ | सेल्फी पॉईट करणे | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| २५ | मॉडेल रस्ता विकसीत करणे | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| २६ | मोबाईल टॉवर उत्पन्नातून विकास कामे करणे | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| २७ | उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव करणे | २.०० | १.०० | | ३.०० |
| २८ | सामाजिक संस्थांना देणगी | ०.०० | ६.०० | | ६.०० |
| २९ | रस्ते डांबरीकरण व नुतनीकरण | ५.०० | ६०.०० | | ६५.०० |
| ३० | नविन इमारती | १००.०० | २०.०० | | १२०.०० |
| ३१ | क्रीडा साहित्य खरेदी | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| ३२ | विकास भार निधीतून खर्च (नगररचना भून संपादन) | ३७५.०० | १३१.२५ | | ५०६.२५ |
| ३३ | अल्पसख्यांक बहुल वस्ती सुधारणा | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ३४ | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी | ५.०० | १५.०० | | २०.०० |
| ३५ | आयुक्त व प्रमुख कार्यालय वेतन | २९०.०० | २०.३० | | ३१०.३० |
| ३६ | अभिलेख कक्ष वेतन | २२.०० | १.५४ | | २३.५४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | भांडार विभाग वेतन | ४०.०० | २.८० | | ४२.८० |
| ३८ | आस्थापान  विभाग व मागासवर्ग कक्ष वेतन | ९३.०० | ६.५१ | | ९९.५१ |
| ३९ | विधी विभाग वेतन | १८.०० | १.२६ | | १९.२६ |
| ४० | कामगार विभाग वेतन | १६.०० | १.१२ | | १७.१२ |
| ४१ | महिला व बाल कल्याण व सुवर्ण जयंती विभाग वेतन | १४.०० | ०.९८ | | १४.९८ |
| ४२ | नगरसचिव विभाग वेतन | २१०.०० | १४.७० | | २२४.७० |
| ४३ | संगणक विभाग वेतन | ४७.०० | ३.२९ | | ५०.२९ |
| ४४ | माहिती व जासंपर्क विभाग वेतन | २८.०० | १.९६ | | २९.९६ |
| ४५ | ग्रंथपाल यांचे पथक वेतन | २९.०० | २.०३ | | ३१.०३ |
| ४६ | एल. बी. टी विभाग वेतन | २२८.०० | १५.९६ | | २४३.९६ |
| ४७ | माहिती व सुॅविधा केंद्र वेतन | ५४.०० | ३.७८ | | ५७.७८ |
| ४८ | प्रभाग समिती कार्यालये (४ प्रभाग) वेतन | ३२०.०० | २२.४० | | ३४२.४० |
| ४९ | मुल्य निर्धारण व कर संकलन विभाग वेतन | ५१०.०० | ३५.७० | | ५४५.७० |
| ५० | मुख्य लेखा व वित्त विभाग वेतन | १२०.०० | ८.४० | | १२८.४० |
| ५१ | लेखापरीक्षण विभाग वेतन | ५२.०० | ३.६४ | | ५५.६४ |
| ५२ | क्रीडा व सांस्कृतिक विभाग वेतन | १८.०० | १.२६ | | १९.२६ |
| ५३ | सुरक्षा विभाग वेतन | १०.०० | ०.७० | | १०.७० |
| ५४ | उद्यान विभाग वेतन | ५१६.०० | ३६.१२ | | ५५२.१२ |
| ५५ | बांधकाम व प्रकल्प(झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन)विभाग वेतन | ११००.०० | ७७.०० | | ११७७.०० |
| ५६ | पाणी पुरवठा विभाग वेतन | ११००.०० | ७७.०० | | ११७७.०० |
| ५७ | नगररचना व अतिक्रमण विभाग वेतन | २५२.०० | १७.६४ | | २६९.६४ |
| ५८ | विद्युत विभाग वेतन | ३४५.०० | २४.१५ | | ३६९.१५ |
| ५९ | यांत्रिकी विभाग वेतन | १८०.०० | १२.६० | | १९२.६० |
| ६० | पर्यावरण विभाग वेतन | १२.०० | ०.८४ | | १२.८४ |
| ६१ | आरोग्य व घनकचरा व्यवस्थापन विभाग वेतन | ३७५०.०० | २६२.५० | | ४०१२.५० |
| ६२ | आरोग्य प्रशासन व व्यवस्थापन विभाग वेतन | २४०.०० | १६.८० | | २५६.८० |
| ६३ | नगर मनपा रुग्णालय व आरोग्य सेवा विभाग वेतन | ७१०.०० | ४९.७० | | ७५९.७० |
| ६४ | रक्तपेढी विभाग वेतन | ८४.०० | ५.८८ | | ८९.८८ |
| ६५ | अग्निशमन विभाग वेतन | १०५.०० | ७.३५ | | ११२.३५ |
| ६६ | मलेरिया विभाग वेतन | १५०.०० | १०.५० | | १६०.५० |
| ६७ | कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभाग वेतन | ११५.०० | ८.०५ | | १२३.०५ |
| ६८ | आस्थापना वाढीव वेतन खर्च | ३०.०० | २.१० | | ३२.१० |
| ६९ | नविन प्रशासकीय इमारत | ०.०० | ३.०० | | ३.०० |
| ७० | अग्निशमन सुरक्षा साहित्य खरेदी | ०.०० | ३.४४ | | ३.४४ |
| | **एकुण** | **११९५४.५१** | **२३७२.५०** | **२०.००** | **१४३०२.५१** |

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका